म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू. प्रवास
वा. क्र.
दाखल १८९०

६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय ... प्रवास
संग्रहालय क्रमांक
लेखक
सन १८९७
पुस्तकाचें नांव श्रीवज्रेश्वरीवर्णन

६१
सं. क्र.

# श्रीवज्रेश्वरी वर्णन

भू प्रवास

अनु - ६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

हें पुस्तक,

तपोनिधि महंत बाळिरामगिरी रामचंद्रगिरी संस्थान श्रीवज्रेश्वरी यांस त्यांची श्रीच्या चरणीं अद्वैत निष्ठा पाहून प्रेमादरानें हक्कासह नजर केलें आहे.

आपला आज्ञाधारक,

बळवंत खंडूजी पारख,

नासिककर.

भाद्रपद शु० ११ शके १८१९ मु० नासिक.

# प्रस्तावना.

हें श्रीवज्रेश्वरीचरित्र लिहिलें; ह्यांत पूर्वभागांत पूर्वीची आणि सांप्रतची स्थिति लिहून, उत्तरभागांत श्रीवज्रेश्वरीचरित्राचें संस्कृतावरून मराठींत केलेलें भाषांतर आहे. ह्यांत ज्या ज्या गोष्टी आहेत, त्या त्या मूळ पोथींत असून भाषांतरांत माझ्या अल्पबुद्धीनें जशा दिसल्या तशाच लिहिल्या. ह्यांत कमीजास्ती कांहींच केलें नाहीं किंवा वाढवून लिहिलें नाहीं. मात्र भाग तिसरा आणि पंधरावा ह्यांत श्रीदेवीच्या स्तुतीचें भाषांतर मात्र कविताबद्ध केलें आहे. पूर्वभागांत हल्लीं संस्थानस्थिति कशी आहे, पूर्वीं कशी होती ह्याचें दिग्दर्शन केलें आहे. हें पुस्तक वाचून ह्यांतील गुणलेश ग्रहण करून चतुर जनांनीं दोष त्यागावे ही प्रार्थना करितों.

ब० खं० पारख, मु० नासिक.

# पूर्व भागाची अनुक्रमणिका.


१ नांव. ... ... ... ... ... ... १

२ स्थल. ... ... ... ... ... ... १

३ सीमा. ... ... ... ... ... ... ३

४ वज्रेश्वरीसंस्थानाकडे असलेलीं गांवें. ... ... ३

५ वज्रेश्वरीचें देऊळ. ... ... ... ... ... ४

६ वज्रेश्वरीच्या देवालयांतील मूर्ति. ... ... ... ५

७ वज्रकुंड. ... ... ... ... ... ... ८

८ रामेश्वरमहादेव व उष्णोदकाचीं कुंडें. ... ... ९

९ भीमेश्वरमहादेव, त्याचे संनिधचीं कुंडें आणि उष्णोदकाचे झरे. ... ... ... ... ... १०

१० वज्रेश्वरीच्या भोंवतालची वनशोभा ... ... ... ११

११ वज्रेश्वरीची यात्रा केल्याचें फळ. ... ... .. १३

१२ वज्रेश्वरीस दिलेल्या आणखी देणग्या. ... ... १४

१३ गायकवाडसरकारचा चौघडा. ... ... ... १५

१४ जव्हार आणि धार संस्थानांतून वार्षिक नेमणूक. ... १६

१५ इंग्लिशसरकारांतून मोबदला. ... ... ... १६

१६ वज्रेश्वरीस पिण्याच्या पाण्याची सोय. ... ... १७

१७ वज्रेश्वरीसंस्थानची २५ वर्षांपूर्वींची स्थिति. ... १७

१८ वज्रेश्वरीचें हल्लींचे वहिवाटदार बळिरामगिरी ह्यांचें संक्षिप्त चरित्र आणि संस्थानची सांप्रतची स्थिति. २०

१९ वज्रेश्वरीची यात्रा. ... ... ... ... ... २६


२० संस्थान वज्रेश्वरीचे मूळ संपादक. ... ... ... ३१

२१ वज्रेश्वरीसंस्थानिकांस विनंति. ... ... ... ३२

२२ वज्रेश्वरीस शके १८२० सालीं केलेलीं नवीन कामें. ३३

## उत्तरभागाची अनुक्रमणिका.

१ भाग पहिला—कैलासवर्णन. ... ... ... ३६
२ भाग दुसरा—इंद्रादि देवांचें पलायन. ... ... ४०
३ भाग तिसरा—जगदंबस्तुति ( कविता ). ... ४४
४ भाग चवथा—वज्रेश्वरीच्या उत्पत्तीचें देवीनें सांगितलेलें भविष्य. ... ... ... ... ... ५०
५ भाग पांचवा—कलिकालदैत्याचें भ्रमण ... ... ५२
६ भाग सहावा—वज्रेश्वरी क्षेत्रवर्णन. ... ... ५६
७ भाग सातवा—दैत्यसेनाप्रबंध. ... ... ... ५९
८ भाग आठवा—दंतुरराक्षसाचा वध. ... ... ६२
९ भाग नववा—तुंगभद्रराक्षसाचा वध. ... ... ६५
१० भाग दहावा—कुशीलराक्षसाचा वध. ... ... ६९
११ भाग अकरावा—कोलासुरसेनासज्जीकरण व त्याचा वध. ... ... ... ... ... ७२
१२ भाग बारावा—कलिकालराक्षसाचें वर्णन आणि वज्रेश्वरीप्रादुर्भाव... ... ... ... ... ७८
१३ भाग तेरावा—श्रीवज्रेश्वरीच्या हस्तें दुर्धर सिंहवक्त्र आणि लोहिताक्ष ह्या राक्षसांचा वध. ... ... ८४
१४ भाग चवदावा—श्रीवज्रेश्वरीच्या हस्तें चंडवेग आणि कलिकालराक्षसांचा वध. ... ... ... ९२
१५ भाग पंधरावा—श्रीदेवीची स्तुति ( कविता. ) ... ९८


रेणुका.
वज्रेश्वरी.
कालिका.

वा. मु. मा. १९

# श्रीवज्रेश्वरीवर्णन.

## पूर्वभाग.

### पूर्वींची आणि सांप्रतची स्थिति ह्यांचें वर्णन.

**नांव**—वज्रेश्वरी हें नांव प्राप्त होण्याचा उद्देश असा आहे कीं, इंद्राशीं कलिकाल नांवाचा दैत्य युद्ध करित असतां इंद्राचीं सर्व शस्त्रें त्या कलिकालानें गिळिलीं. तेव्हां इंद्राच्या हातांत फक्त एक वज्र राहिलें त्यानें त्यानें त्या राक्षसास मारिलें. त्या वेळेस राक्षसानें आपल्या शस्त्रानें त्या वज्राचे दोन तुकडे केले. त्या वेळीं त्या वज्रापासून ही देवी उत्पन्न झाली ह्मणून हिचें नांव वज्रेश्वरी ठेविलें.

**स्थल**—ही वज्रेश्वरी साधारण लोकांत वज्राबाई, व थोरले बाजीरावसाहेब यांचे बखरींत वज्रयोगिनी, ह्या नांवानें ठाणें जिल्ह्यांत प्रसिद्ध आहे. मूळगांव वडवली नांवाचें होतें; पण तें देवीच्याच नांवानें ह्मणजे वज्रेश्वरी किंवा वज्राबाई ह्या नांवाखालीं सध्यां मोडत आहे.

यात्रेच्छु किंवा स्थलावलोकनेच्छु मित्रांनीं जी. आय. पी. रेलवेच्या कल्याणस्टेशनावर उतरून तरींत बसून कल्याणची खाडी ओलांडावी; नंतर भिवंडी येथें यावें. भिवंडीहून बैलांची गाडी किंवा तांगा शक्त्यनुसार करून वा-

ज्याच्या सडकेनें अनगांवकवाडावरून वज्रेश्वरीस जाण्यास निघावें. कवाडगांवीं परमसाधु सखारामबोवा कवाडकर ह्यांच्या समाधीचें दर्शन घ्यावें. हें स्थल अति रमणीय असून प्रेक्षकांच्या अंतःकरणास तुष्ट करणारें आहे. हे सखारामबावा नासिकच्या रघुनाथभटजींचे शिष्य असून मोठे सिद्ध होते. त्यांचें वेगळें चरित्र आहे तें पहा.

अनगांवकवाडाहून जातांना पुढें वाड्याच्या सडकेवरचा भिवंडीपासून ११ वा मैल, ह्या मैलापासून पश्चिमेकडे वळून तेथून ४ मैलांवर वज्रेश्वरी लागेल. हे चार मैल जाणें गाडींतून किंवा तांग्यांतून अति कष्टदायक व मोठ्या दगदगीचें होतें. पण ह्या दगदगीपासून सर्व लोकांस ज्या महात्म्यांनीं वांचविलें त्यांचा नामनिर्देश करणें एथें अप्रासंगिक होणार नाहीं, असें जाणून, त्यांचीं नांवें आपणांसमोर मोठ्या प्रेमानें आणितों. १ मे. शिलकाकसाहेब कलेक्टर ठाणें, २ रा. ब. गणेश कृष्ण अपटे, इंजीनियर, ठाणें, ३ रा० ब० दाजीसाहेब गुप्ते, व ४ रा० सा० रा० ब० आचार्य व लोकलबोर्ड कमिशनर. ह्या चौघांच्या दीर्घ परिश्रमानें लोकल बोर्डांतून १७ हजार रुपयांची मंजुरी घेऊन ह्या चार मैलांत यात्रेकऱ्यांना खस्ता खाव्या लागत, तो रस्ता सडकेचा करण्याचा विचार ठरला. हल्लीं झाडें तोडून, सडक आंखून, खडीचे गंज राखून ठेविले आहेत. वाडे सडकेच्या ११ व्या मैलाजवळ उंबरपाडागांव आहे, त्याच्या दक्षिणबाजूकडून ह्या सडकेची

योजना रा० ब० अपटेसाहेबांनीं केली आहे. वाटेंत सैतानी (भुताळी) नांवाची नदी नामाप्रमाणें कृति करणारी लागते, तिला फरशी करण्याचा विचार दिसतो. सारांश, हें रस्त्याचें महत्संकट अपटेसाहेबांच्या खटपटीनें झटपट नाहींसें होणार, हें फार चांगलें आहे. आतां थेट भिवंडीहून निघून एकसारखें वज्रेश्वरीपर्यंत बिनतक्रार न उतरतां, आंगास हिसके न बसतां १९ मैल वज्रेश्वरीस आपण जावें. अशी ही नवीन व्यवस्था झाली आहे.

**सीमा**—वज्रेश्वरी भिवंडीच्या वायव्येस आहे. वज्रेश्वरीगांव डोंगराच्या उत्तरेकडील उतरणीवर आहे. ह्या गांवाच्या पूर्वेस अकलोलीगांवची हद्द, दक्षिणेस उसगांवची शींव डोंगरास लागून, पश्चिमेस गणेशपुरी नांवाचें गांव, आणि उत्तरेस तानसानदी व तिच्या पलीकडे वाडें तालुका. ह्याप्रमाणें सीमांच्या मध्यें वज्रेश्वरी आहे.

**वज्रेश्वरीसंस्थानाकडे असलेलीं गांवें**—ह्या संस्थानाकडे ९ गांवें श्रीमंत पेशवेसरकारापासून हल्लींच्या कृपाळू सरकारपावेतों चालत आहेत. त्यांत भिवंडी तालुक्यांत ३; तीं:— १ वडवली ऊर्फ वज्रेश्वरी, हें पुरातन आहे. २ कण्हेरी आणि ३ फेणें. वसई तालुक्यांत ३ गांवें आहेत; तीं:— १ भिनार, २ अंबोडें आणि ३ वडघर. हीं पेशवेसरकारांतून मिळालीं आहेत. ह्याप्रमाणें ह्या संस्थानास एकंदर ६ गांवें श्रीमंत पहिले बाजीरावसाहेब पेशवे ह्यांनीं दिलीं असून, ती देणगी ह्या

वेळेपर्यंत अबाधित चालू आहे. ह्या गांवांची देणगी इसवी सन १७३१ च्या सुमारास आहे. ह्या सर्व गांवच्या उत्पन्नांतून ह्या संस्थानचा खर्च आजपावेतों चालत आहे. वज्रेश्वरीगांव ७९ घरांचा आहे. सर्व गांवें ह्याचप्रमाणें लहान लहान आहेत.

**वज्रेश्वरीचें देऊळ**—हें देऊळ पहिले बाजीराव पेशवे ह्यांनीं बांधिलें आहे. अगदीं बरोबर पूर्वाभिमुख साधून अग्रभागीं मोठा थोरला कमानी दरवाजा केला आहे. व चोहोंबाजूंनीं बळकट कोट बांधिला आहे. तो कोट पहातांच प्रथमदर्शनीं हा मोठा किल्ला असावा असें वाटतें. हें देवालय अजमासें १९० वर्षांचें जुनें असून अद्याप फार मजबूत आहे. ह्यास दोन गाभारे आहेत. ह्याचा प्रथममजला दगडी माठीव केलेला असून दुसरा मजला ह्मणजे शिखर हें सर्व चुनेगच्ची केलेलें आहे. नवीन केलें तेव्हां उत्तम रंगीत असावें. हल्लीं तो रंग कांहीं बेरंग झाला आहे. देवीच्या मूर्ति जेथें आहेत, तेथील जागा मेघडंबरी घांटाची असून तो गाभारा अजमासें शंभर लोक उभे राहतील असा आहे. हा पश्चिमेकडचा गाभारा [illegible] [illegible] [illegible] हाय. ह्याचे पूर्वेकडचा गाभारा [illegible] मोठा असून त्यांत २०० मनुष्यांचा समावेश होईल इतकी जागा आहे. देवालयांतील दोन गाभाऱ्यांचे पूर्वेस देवालयास लागून उत्तम प्रकारचा सभामंडप श्रीमंत सेनाखासखेल समशेरबाहादूर के० खंडेरावमहाराज गायक-

वा मू. पा.
१५



वाडसरकार, बडोदें, ह्यांनीं संवत् १९२० ह्या सालीं बांधिला आहे. त्याचप्रमाणें पूर्वबाजूच्या कमानी दरवाजावर नगारखाना हाही गायकवाडसरकारांनीं ह्याच वर्षी बांधिला आहे.

कमानी दरवाजांत आल्याबरोबर जो रमणीय देखावा, भोंवतालची गर्द झाडी, उत्तरेस तानसानदी, ईशान्येस रामेश्वर महादेवाचें देवालय, पूर्वेस बारा कोसांवरचा माहुलीचा किल्ला, इ० चहूं बाजूंची वनशोभा पाहिल्यावर ह्या सृष्टिसौंदर्याची रमणीयता नेत्रांस आल्हादित करिते. कमानी दरवाजाचे पूर्वेकडे अजमासें ६० हात खोली आहे. ह्या जागीं कैलासवासी श्रीमंत गोपाळराव वासुदेव ऊर्फ नानासाहेब चांदवडकर नासिकचे प्रसिद्ध सावकार ह्यांनीं ९२ पायऱ्या दगडी चिरेबंदी बांधिल्या आहेत. पायऱ्यांचे पूर्वबाजूस उत्कृष्ट दीपमालाही त्यांनींच बांधिली आहे. ही दीपमाला मोठी विस्तीर्ण असून तिच्यावर जाण्यास आंतून फिरता जिना केला आहे. हें काम श्रीमंत चांदवडकर ह्यांनीं शके १७७० सालीं केलें आहे. हे चांदवडकर मोठे धर्मशील व उदार असे होते. ह्यांनीं ३० लक्ष रुपये धर्मादाय केले, अशी आमच्या नासिकास गोष्ट सांगतात. प्रत्यक्ष पहाणारे कांहीं लोक आहेत.

**देवालयांतील मूर्ति**—पश्चिमेकडील दुसऱ्या गाभाऱ्यांत मेघडंबरी जागा जी वर सांगितली त्या जागेंत मध्यभागीं श्रीवज्रेश्वरीची मूर्ति अतिरमणीय, सिंदूरवर्ण,

सालंकार, सुवस्त्रमंडित, हातीं गदा व खड्ग घेऊन उभी आहे. खड्ग हातीं असण्याचें कारण असें दिसतें कीं, जे दुराचारी, नास्तिक, वगैरे लोक ह्यांचा नाश व्हावा ह्मणून खड्गशस्त्र घेतलें आहे. गदा हातीं घेण्याचें कारण, जे धार्मिक, सच्छील नरवर त्यांना सौख्य होऊन त्यांच्या शत्रूंचा नाश व्हावा, ह्यासाठीं हातांत गदा घेतली असावी. वज्रेश्वरीच्या उजवे बाजूस रेणुकेची मूर्ति; ही पण वज्रेश्वरी-एवढी व वज्रेश्वरीसारखीच आहे; शिवाय महालक्ष्मी व्याघ्र, सप्तशृंगदेवीची मूर्ति ह्या सर्व उजवे बाजूस आहेत. डाव्या बाजूस कालिकेची मूर्ति वज्रेश्वरीसारखीच आहे. शिवाय, भार्गवरामाची मूर्तीही डावे बाजूस आहे. ह्या सर्व मूर्ति ज्या स्थानावर आहेत तें स्थान उत्तम श्रृंगारलेलें सुवर्णमय केलेलें आहे. देवीच्या पुढें मर्यादेस्तव दक्षिणोत्तर आडवा स्तंभ लाविला आहे, तो सर्व पितळेनें मढविलेला असून त्यावर नवसाचे अनेक रुपये ठोकलेले आहेत. पण ते जसे सराफाचे घरीं खोटे रुपये खिळे मारून ठोकलेले तसे मात्र नाहींत हो! तर खरे रुपये खऱ्या भावानें खऱ्या नवसांचे खरोखर आहेत.

दुसऱ्या मोठ्या गाभाऱ्यांत दक्षिणबाजूस श्रीवक्रतुंड गणराज, कालभैरव, वेताळ हे असून उत्तरबाजूस सरस्वती, महादेव व पार्वती ह्यांच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्यांत प्रतिशब्द होतो. गाभाऱ्यांतून दक्षिणोत्तरपूर्व असे रस्ते असून प्रदक्षिणेकरितां उत्तम पाषाणमय मार्ग पूर्वीच

देवालयकारांनीं व्यवस्थित बांधिला आहे. देवालयाचे दक्षिणेस प्राकाराचे आंत श्रीमहादेवाचें लहान देवालय असून एक सव्यशुंडादंडमंडित गणराजमूर्ति विराजमान आहे.

प्राकाराचे पूर्वबाजूस ह्मणजे कमानी दरवाजाचे दक्षिणोत्तरभागीं दोन भव्य बुरूज असून परशत्रुभयरक्षणार्थ त्या बुरुजांस गोळया मारण्याकरितां जंग्या ठेविल्या आहेत. ह्या बुरुजांची भव्यता! प्राकारांचा मजबूतपणा! कमानी दरवाजाची ठेवण, हें पाहिल्यावर एवढाले दगड अशा अवघड जागीं वर कसे चढविले ह्याजबद्दल पूर्वीच्या कारागिरीचें नवल वाटतें! देवालयाचे बाजूस कोटाचे आंत आंबे, सोनचांफा, मुचकुंद, रामफळीचीं वगैरे झाडें असून तीं झाडें फारच उंच उंच वाढलीं आहेत. जणू काय, श्रीदेवीस ऊन लागेल ह्मणून तिच्या देवालयावर आपल्या डाहाळया हींच छत्रें त्या वृक्षांनीं धरलीं आहेत. दक्षिणेकडे कोटाच्या लगतच एक मोठा अश्वत्थवृक्ष असून त्याचे पश्चिमेस डोंगरावर चढून जाण्याचा मार्ग आहे. डोंगरावर एक सिद्धाचें स्थान असून त्या सिद्धास गोदडबोवा असें ह्मणतात. ह्या अश्वत्थाचे पूर्वेस उतरून गेल्यावर वज्रेश्वरीसंस्थानचे वहिवाटदार ह्यांचें राहण्याचें घर, कचेरी वगैरे आहेत.

प्राकारामध्यें महादेवाचें देवालय जें वर सांगितलें त्याच्या पूर्वेस ह्या संस्थानच्या पूर्वीच्या मालकांचे व इतर सिद्धजनांच्या समाधींचें स्थल आहे. ही जागा

व्यवस्थित ठेविलेली असून प्राकारांत जरी आहे तरी अगदीं वेगळी आहे.

**वज्रकुंड**—वज्रेश्वरीच्या देवळापासून अजमासें ९० हातांवर वज्रकुंडनांवाचें तळें आहे. हें चहूं बाजूंकडून उत्तम तऱ्हेचें बांधिलें आहे. ह्याची ही बांधणी कै० नानासाहेब चांदवडकर ह्यांनीं करविली. ह्या तलावाची मरामत उत्तम प्रकारची असल्यानें ह्याचें पाणी चांगलें असतें. ह्या तलावाचे कांठीं जगदंबेच्या पूजेकरितां लागणारीं पुष्पें विपुल मिळतात. तलावाच्या चहूं बाजूंनीं उत्तम प्रकारचा बगीचा केला आहे. त्यांत गुलाब, मोगरा, जाई, जुई, सेवंती, अनंत, तगर, अगरु, हरितचंपक, पीतचंपक, श्वेतचंपक, कण्हेर पांढरा तांबडा, जास्वंदी पांढरी तांबडी भगवी, पिंवळा कण्हेर, कोरांटी, शेंदरी, मखमाल, निशीगंध, दवणा, पाच, आंबे, डाळिंबें, फणस, निंबें, बदाम, चंदन, अननस, सुपारी, नारळ, केळी, कर्दळी, जांभळी, अशा जातीचीं झाडें आहेत. ह्या बागेस तलावाचें पाणी मोटेनें मिळण्याची सोय आहे. तलावांत उतरण्यासाठीं दोन जागीं उत्तम सोय आहे. चहूं बाजूंस बांधकाम उत्तम असून शिवाय बाहेरचे बाजूस उत्तम भराव करून काम मुस्तकीम केलें आहे. ह्याच्या पाण्याचा उपयोग जगदंबेच्या स्नानाकरितां, यात्रस्थानच्या पानाकरितां करितात. जर कां यात्रस्थ यांत स्नान करते तर मग श्रीत्र्यंबकेश्वर कनखलतीर्थत्वच ह्या तलावास येतें.

**रामेश्वर महादेव व उष्णोदकाचीं कुंडें**—वज्रेश्वरीच्या देवालयाचे ईशान्येस अर्ध्या मैलावर तानसानदीच्या दक्षिणकिनाऱ्यावर रामेश्वर महादेवाचें देवालय बांधिलें आहे. हें देवालय पहिले बाजीराव ह्यांचे कारकीर्दींत वसईचे सुभे शंकराजी केशव यांनीं बांधिलें. देवालयांतील पिंडी फारच उत्तम आहे. पुढें नंदिकेश्वर असून देवालयाचे अगदीं सन्निध ह्मणजे दोन हातांवर पूर्वबाजूस एकासएक लागून अशीं तीन कुंडें उत्तम रीतीनें दगडी बांधिलेलीं आहेत. पश्चिमेकडील कुंडांतील पाणी चांगलें उष्ण, त्याचे पूर्वेकडील कुंडांतील त्याच्यापेक्षां थोडें उष्ण व अगदीं पूर्वबाजूच्या कुंडांतील पाणी साधारण कोमट असें आहे. हीं कुंडें तानसानदीच्या दक्षिणकिनाऱ्यावर नदीपासून वीसपंचवीस हातांवर आहेत व नदीपेक्षां १० हात उंचीवर आहेत. पाण्यास गंधकासारखा वास येतो. आठ वर्षांच्या मुलास कुंडांत उभें केलें तर त्याच्या गळ्याइतकें पाणी दरएक कुंडांत आहे. ह्या कुंडांस अनुक्रमें राम, लक्ष्मण व सीता अशीं नांवें आहेत. ह्या कुंडांचे उत्तरेस मारुतीकुंड ह्मणून चवथें कुंड आहे. कुंडाचे पूर्वबाजूस एक तलाव बेमरामत पडला असून त्यांत अत्यंत सुशोभित अशीं तांबडीं कमळें आहेत. हें स्थल फार रमणीय आहे. मी स्वतां तिन्ही कुंडांत दोन कलाक खुशालपणें बसलों होतों; नंतर बाहेर आल्यावर मला क्षुधेनें फार त्रास दिला. असाच प्रकार सर्वांचा होतो,

ह्मणून मला तेथें कळलें. हा बहुधा त्या उष्णोदकाचा गुण असावा, असें वाटतें. ह्यावरून ज्यांना भूक लागत नसेल त्यांनीं ह्या कुंडांचीं स्नानें करून जठराग्नि प्रदीप्त करावा. हें देऊळ व हीं कुंडें अकलोली गांवच्या हद्दींत आहेत, पण वज्रेश्वरीच्या अगदींच जवळ आहेत.

**रामेश्वराचे देवळाजवळचीं कुंडें**—रामेश्वराचे देवळाच्या उत्तरेस व पश्चिमेस तानसानदीच्या कांठावर व नदीच्या पात्रांत अनेक उष्णोदकाचीं कुंडें आहेत. एक तर नदीच्या वाहत्या धारेंत मीं चमत्कारिक कुंड पाहिलें. तें असें कीं वर वाहून येणारें पाणी गार व जेथें ती उष्णोदकाची उकळी निघते तेथें पाणी कढत होतें. ईश्वरनिर्मित चमत्कार आहे!

ह्या तानसानदीच्या दक्षिणबाजूस नदीपासून एक दोन हातांवर अशीं लहान लहान कुंडें पूर्वींच्या महात्मे लोकांनीं बांधिलीं आहेत. त्यांत अग्निकुंड अत्यंतच उष्णोदकाचें आहे; तें इतकें कीं त्यांत बोट घालवत नाहीं. ह्याचप्रमाणें सूर्यकुंड, वायुकुंड, चंद्रकुंड, ब्रह्मकुंड, वगैरे पुष्कळ कुंडें उष्णोदकाचीं आहेत. हीं रामेश्वराचे देवालयापासून शंभर हातांच्या अंतरावर आहेत.

**भीमेश्वर महादेव, त्याचे सन्निधचीं, व तानसानदींतील कुंडें आणि उष्णोदकाचे झरे**—भीमेश्वरमहादेवाचें देऊळ वज्रेश्वरीच्या वायव्येस अजमासें दोन मैलांवर भिवाळी गांवच्या शिवारांत तानसानदीच्या

वा. मु. सा. १५८



झाल्याचें उदाहरण निश्चयानें नाहीं, असें कळतें. योगीजनांस निरामय अरण्यवास फार आवडतो, त्याप्रमाणें साक्षात् वज्रयोगिनी देवी जर आहे तर तिला हा असा निबिड वृक्षाच्छादित वास कां न आवडावा? मी ज्या वेळेस वज्रेश्वरीस गेलों त्या वेळेस मार्गशीर्ष महिना असल्यामुळें हें सर्व अरण्य जणू काय थंडीची बाधा होईल ह्मणून आपल्या पर्णवस्त्रांनीं पूर्ण झांकलेलें होतें, त्यामुळें विशेष शोभा दिसत असे. हेंच अरण्य उष्णकाळांत पहावें तर जणू काय उकाडा होऊं लागला ह्मणून आपलीं सर्व पर्णरूप वस्त्रें टाकून उघडे होऊन बसलेले वृक्षसाधु दृष्टीस पडतात. पर्जन्यकाळांत ह्या अरण्यांतील वृक्ष आपल्या नूतन पल्लवछत्रांनीं भूषित होऊन संत[illegible]धार सहन करितात असें वाटतें. पर्जन्यकाळ ह्मटला ह्मणजे वज्रेश्वरीस पूर्णपणानें होतो. जसी आपणास पेंठ हर्सूल, विगतपुरी, ह्यांचीच आजीबाई वज्रेश्वरी! तेव्हां तेथील पर्जन्यातिशयाविषयीं ज्यास्त सांगणें नको व लिहिणेंही नको.

## ४ वज्रेश्वरीची यात्रा केल्याचें फळ.

वज्रेश्वरीच्या यात्रेपासून सर्व प्रकारच्या व सर्व धर्मांच्या लोकांस फलश्रुति क्रांहींतरी होईल हें खात्रीनें सांगतों. ह्या यात्रेस कट्टा सुधारक जर गेला तर तेथील वनश्री पाहून ईश्वरलीलेचें कौतुक करील. भाविक जर यात्रेस गेला तर देवीस अनन्यभावें शरण जाऊन देवीची प्रातः-

कालीं होत असलेली काकडआरती, दोन प्रहरीं होत असलेला नैवेद्य, सायंकाळची शेजारती इत्यादिकांनीं त्याचें अंतःकरण तल्लीन होऊन जाईल. आतां परधर्मी लोक ह्या स्थळीं आले तरी तेथील अरण्यांत नदीच्या कांठीं असलेलीं उन्हाळीं पाहून त्यांना परमेश्वरकृत चमत्कृतीचें नवल वाटेल.

सारांश काय कीं, ह्या स्थलीं सर्व लोकांचें चित्तरंजन व्हावें असा ईश्वरी संकेत दिसतो. जसें तुकारामांच्या अभंगांत एखादें चरण असतें; तसें हें स्थल सर्व व्यक्तींचें रम्यस्थान होय. आतां तुकारामांच्या अभंगांतील एक चरण आपणांस ह्या प्रसंगीं सांगितल्यास तें समयोचित [illegible] करितां तें सांगतों. "लांचावलें मन लागलीसे गोडी" हें चरण कोठेंही योजिलें तरी जसा कोंदणांत हिरा शोभतो तसें शोभेल. मोठमोठे राजे हजारों लष्कर घेऊन [illegible]वर चाल करतात, त्याचें कारण वरचें चरण. मोठमोठे योगी, मोठमोठे मौलवी, फकीर, साधु, बिशप, पुंगी, जैनसाधु, संसार सोडून गिरिकंदरीं कपाटांत बसले ह्याचें कारण वरचें चरण. ह्याप्रमाणें हजारों चरण सर्वव्यापक जसे तुकारामांनीं आपल्या अभंगांत ठेविले, त्याचप्रमाणें हें स्थल सर्वव्यापक व सर्व प्रकारच्या लोकांचें मनोरंजन होण्यास परमेश्वरानें निर्माण केलें आहे.

## श्रीवज्रेश्वरीस आणखी दिलेल्या देणग्या.

पेशवेसरकारांनीं दिलेल्या देणग्या हल्लींच्या दयाळू

सरकारांतून अव्याहत चालू असून कोणत्याही प्रकारचा त्यांत खंड नाहीं. सहा गांवें व त्यांतील जंगल वगैरे सर्व उत्पन्न श्रीकडे चाललेंच आहे. ह्याशिवाय ज्या ज्या थोर श्रीमानांकडून व्यवस्थित देणग्या मिळाल्या असून चालू आहेत त्याः-

**गायकवाडसरकारचा चौघडा**—संवत् १९२० सालापासून श्रीमंत सेनाखासखेल समशेरबहादर गायकवाडसरकार ह्यांनीं चवघडा सुरू केला; आणि त्याची वार्षिक सनद श्रीयुत कैलासवासी खंडेरावमहाराजांनीं करून दिली. प्रत्यहीं हा चवघडा त्रिकाळ झडतो. हा चवघड्याचा ध्वनि होतो असें नाहीं, तर तो श्रीमंत गायकवाडसरकारच्या कृत्यांस "धन धन" (धन्य धन्य) असें ह्मणून सर्व अरण्य दणाणवून सोडतो!

कै० श्रीमंत खंडेरावमहाराजांची औदार्यशक्ति अतितर असून कोणीही त्यांच्यासमोर जाऊन रिक्तहस्तांनीं परत आलाच नाहीं. एकवेळ एक कन्हय्या भांड त्यांच्याकडे येऊन त्यानें आपलें नृत्यकौशल्य दाखविलें. त्यास सवालक्ष रुपये देणगी दिली! मला वाटतें हल्लीं असें औदार्य कचितच दृष्टीं पडेल. असो. ह्या महाराजांच्या औदार्याचें, धर्मकृत्यांचें, देणग्यांचें स्मरण होतांच कवि अनंतफंदीच्या "उदार स्वामीसेवक त्यांना कर्णाची उपमा साज" ह्या चुटक्याचें घटकाभर स्मरण होऊन त्याचा घुटका घ्यावासा वाटतो. व हल्लींच्या लटक्या काळांत चुटक्यांचे मांडव

घालणारांपुढें कोरड्या मिटक्या मारीत बसावें लागतें. असो. हेही दिवस जाऊन सुदिन प्राप्त होईल असें आजपावेतों झालेल्या कालाच्या इतिहासावरून वाटतें. हा चौघडा हल्लींच्या कारकीर्दीपावेतों गायकवाडसरकारांनीं अबाधित चालू ठेविल्याबद्दल त्यांचें यशचिंतन करणें हेंच ग्रंथकाराचें कर्तव्य आहे.

**जव्हारसंस्थानांतून वार्षिक नेमणूक**—श्रीदेवीस महापूजा करणें ह्यासाठीं जव्हारसंस्थानचे श्रीमंत पतंगशहा महाराज यांनीं वार्षिक नेमणूक करून दिली आहे, व तीही अव्याहत चालत आहे. त्या नेमणुकीचा प्रभाव, पुत्र, कन्या, सद्गुणी कलत्र, अचल संपत्ति, निरोगी काया. हा अनुभव हल्लींच्या राजमुकुटमणीस पूर्णपणें असून निकटसाहचर्यानें श्रीदेवीचा आणखी पूर्ण आशीर्वाद ते घेतील अशी जव्हारसंस्थानचे श्रीमंतांस विनंति आहे.

**धारचे पवारसरकारांतून नेमणूक**—श्रीवज्रेश्वरीपुढें सतत नंदादीप चालू राहण्याकरितां धारचे श्रीमंत पवारसाहेब यांची वार्षिक नेमणूक आहे.

**इंग्रजसरकारांकडून मोबदला**—वज्रेश्वरीसंस्थानच्या ६ गांवचें अपकारी उत्पन्न आपल्या परम उपकारी सरकारनें घेऊन त्याचा मोबदला १४९ रुपये श्रीदेवीस सरकारांतून मिळतो. सहा गांवांत अपकारीसंबंधीं ह्या संस्थानास कांहींच बोलणें नको; कारण तो हक्क सरकारांत घेऊन त्याचा मोबदला वरच्या रकमेंत आला !

**वज्रेश्वरीस पाणी पिण्याची सोय**—वज्रकुंड नांवाचें तळें ज्याचें वर्णन वर केलें, त्याशिवाय गांवांत विहिरी, आड वगैरे आहेत. हे पर्ज्यन्यकाळांत अगदीं पाण्यानें डबावलेले असतात; पण जसा जसा उन्हाळा येतो तसे तसे ते पातालगामी होत जातात. मग त्यांस उकरून, दगड फोडून, मलमा काढून, जलाकर्षणाची सोय होत असते. तानसानदी पाव कोसावर आहेच. तिचें पाणी जनावरांस मुख्यत्वें पिण्याच्या उपयोगास येतें.

**वज्रेश्वरीसंस्थानची पंचवीस वर्षांपूर्वींची स्थिति**—सांप्रतचे संस्थानचे वहिवाटदार ह्यांचेपूर्वी त्यांचे गुरु महंत रामचंद्रगिरी ह्यांचे कारकीर्दींत ह्या संस्थानची स्थिति अत्यंत शोचनीय होती. "ज्याच्या हातीं ससा तोच पारधी" ह्याप्रमाणें सगळयाच लोकांच्या हातीं कारभार; मग काय? जहागीरदार महंतसाहेब भिवंडीस किंवा कोठें वज्रेश्वरीच्या बाहेर निघाले कीं, पुढें शिंग वाजायाचें, दोन स्वार गाडीमागें घोड्यावर बसून दवडत चालायाचे; ह्याशिवाय गडीमाणसें वगैरे मोठ्या लवाजम्यासुद्धां जाऊन जेथें तळ पडेल तेथें "उधाराचें पोतें सवाहात रितें" उचापत उधार ह्यांशीं गांठ! अशा योगानें संस्थानावर पुष्कळ कर्ज होऊन सावकारांचीं आर्जवें करण्याचा प्रसंग येत असे. वास्तवीक विचारदृष्टचा पाहिलें तर, ज्या संस्थानिकांस ह्याप्रकारें कर्जानें वेढिलें त्यांनीं डामडौलास फांटा देऊन कोणातरी इमानी मनुष्याकडे संस्थानाची

वहिवाट देऊन अनृणी स्थिति येईपर्यंत स्वस्थ कोठेंतरी जाऊन बसावें, सावकारांची व्यवस्था लावावी; पण आह्मी जहागीरदार ह्या अभिमानानें ते ग्रस्त झाल्यामुळें "बुडत्याचे खोल पाय" ह्याप्रमाणें दिवसेंदिवस ते कर्जाच्या पेंचांत येतात. मग काय? कर्ज अति झाल्यावर "अतिखरूज त्यास खाज नाहीं, व अतिकर्ज त्याला लाज नाहीं" अशी त्यांची स्थिति होते. शिवाय "कर्जाच्या पाठीवरी, बसते असत्याची स्वारी." ह्याप्रमाणें असले अविचारी जहागीरदार स्वतां आपण तर बुडतातच, परंतु शिवाय आपल्या पुत्रपौत्रांपावेतों दैन्य भोगण्यास लावितात. ह्याकरितां अशा जहागीरदार, संस्थानिक, किंवा इतर उत्पन्नदार सज्जनांस, विनंति करितों कीं, हें कर्ज गळयापर्यंत आल्यास सावकारांचे हप्ते करून किंवा व्याज खुंटवून सवाई करून आपल्या उत्पन्नाचा भाग कांहीं व्यवस्थेनें नियमित दर वर्षास देऊन आपण स्वतां कर्ज फिटेपर्यंत साध्या स्थितींत राहिल्यास कर्जाची बाधा होणार नाहीं. नाहींपेक्षां हें कर्जरूप खरें विष प्राशन करून वंशाचें निर्मूल करण्यास आपल्या हातानें विषाच्या वाट्या पुत्रांकरितां अथवा नातवांकरितां भरून ठेवणें चांगलें नाहीं. एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे कीं,

"न विषं विषमित्याहुर्ब्रह्मस्वं विषमुच्यते ॥
विषमेकाकिनं हंति ब्रह्मस्वं पुत्रपौत्रिकम् ॥ १ ॥

मी विषास विष ह्मणत नाहीं, तें साधारणपणें एका माण-

सास (जो सेवील त्यास) मारितें, पण हें कर्जरूप विष स्वतांस, पुत्रांस, नातवांस ठार करितें.

ह्या कर्जाच्या चपेट्यांत वज्रेश्वरीसंस्थान सांपडून उत्पन्नाच्या चौपट कर्ज झालें होतें. ह्याचप्रमाणें कांहीं कांहीं खमंग कर्जबाजारी पहाण्यांत येतात कीं, त्यांना वार्षिक उत्पन्नाच्या वीसपट कर्ज असूनही स्वतः चैनबाजींत राजी आहेत. अशा लोकांस जर कोणी उपदेश करण्यास गेला तर तो उपदेशक मूर्ख ठरतो. असो! आपल्या देशामागें जर दैन्य हात धुवून लागलें आहे तर आपली उच्चस्थिति यावी कशी?

ह्या वज्रेश्वरीसंस्थानची स्थिति लिहीत असतां इतर उत्पन्नदार कर्जबाजाऱ्यांकडे वळलों, ह्याबद्दल क्षमाशील वाचक मजवर कृपा करतील अशी आशा करितों.

वज्रेश्वरीसंस्थानास कर्ज झाल्यामुळें व अव्यवस्थेमुळें फारच दैन्यस्थिति प्राप्त झाली, ती इतकी कीं, श्रीस नैवेद्यास शेरभर साखर पाहिजे तर वाण्याचें घर! ह्यापासून मग वरच्या सर्व गोष्टींचा विचार केल्यास लागलेल्या सर्व पदार्थांकरितां सावकारांच्या घरांवांचून गत्यंतरच नव्हतें. अशा स्थितींत हे रामचंद्रगिरीबोवा असून त्यांना संतती नव्हती. ह्यामुळें आपल्यापुढें ह्या संस्थानची स्थिति कशी होईल ह्याचा विचार त्यांच्या मनांत घोळत असे. हा विचार त्यांनीं नासिक एथील तपोनिधि कैलासवासी जोगिंद्रगिरी भवानगिरीबोवा यांस कळविला. जोगिंद्रबोवांची

भगिनी कै० अंबाबाई ह्या रामचंद्रगिरीबावांचें कुटुंब होत्या. ह्या त्रिवर्गांचा विचार ठरून रामचंद्रगिरिबावांनीं माझ्यामागें ह्या संस्थानचे व्यवस्थापक जोगिंद्रबावांचे चिरंजीव बळिरामगिरी हे व्हावे, असें लिहून ठेवून ते शके १७९४ सालीं समाधिस्थ झाले. पुढें ह्याप्रमाणें व्यवस्था होऊन ह्या संस्थानास नवीन वहिवाट बळिरामगिरी हे अज्ञान असल्याकारणानें त्यांचे जनक तीर्थरूप जोगींद्रगिरिबावा पाहूं लागले. तोंपर्यंत ह्या संस्थानच्या मालकिणी कै० अंबाबाई ह्यांचें, नवीन आपले भाचे व हल्लीं झालेले वहिवाटदार बळिरामगिरी ह्यांच्यावर, प्रेम असून शुद्धमन होतें.

वज्रेश्वरीचे हल्लींचे वहिवाटदार तपोनिधि **बळिरामगिरी रामचंद्रगिरी** यांचें संक्षिप्त चरित्र आणि **संस्थानची सांप्रतची स्थिति**—बळिरामगिरी ह्यांचे तीर्थरूप जोगिंद्रगिरीबोवा नासिक एथील राहणारे होते. त्यांचें कापडाचें दुकान असून हे बोवा संसारदक्ष व मोठे व्यापारी होते. रहाणी साधी, संसारव्यवस्था चोख, व्यापार बेताचा, असा होता. जोगिंद्रबोवांचें कुटुंब मुनियाबाई ह्या प्रसिद्ध आनंदगीरबावा आनंदवल्लीचे इनामदार ह्यांची कन्या असून ह्या आनंदगीरबावांस पेशवाईतील वंशपरंपरेचें पेन्शन एक हजार रुपये इंग्लिश सरकार देत असत. त्यांचे कन्येबरोबर जोगिंद्रबावांचे लग्न होऊन श्वशुरांनीं ह्या जामातांस आंदणदेणगी वगैरे पुष्कळ दिली. ह्या सु-

नीयाबाईच्या पोटीं बळिरामगिरी ह्यांचा जन्म शके १७८४ भाद्रपद वद्य १२ रोजीं नासिकपंचवटींत झाला. ह्यांचा बालाभ्यास नासिकपंचवटींत कै० सितारामपंत दंडनाईक मास्तर ह्यांच्या शाळेंत झाला. बळिरामगिरी ह्यांस आह्मी लहानपणापासून पाहतों. ते फार चपलबुद्धीचे व हुशार विद्यार्थी होते. त्यांवर त्यांचे जनक तीर्थरूप जोगिंद्रगीर ह्यांची सुशिक्षा असल्यानें हे दहावे वर्षापासून जमाखर्च, खर्डा वगैरे लिहूं लागले. चांगल्या मुलांची संगती, आईबापांची उत्तम शिकवणूक आणि व्यापारी वळण, ह्या गोष्टींचें बाळकडू बळिरामगिरी ह्यांस लहानपणापासून मिळाल्यामुळें सांप्रत ते उन्नतावस्थेप्रत पोंहोंचले आहेत. बळिरामगिरी ह्यांना थोडें इंग्लिश शिक्षण मिळालें, परंतु पुढें ते दत्तकसंबंधानें वज्रेश्वरीस गेल्यानें तें शिक्षण अर्धकच्चें राहिलें. रामचंद्रगिरीबावांनीं मरणाच्या पूर्वी ठाण्याचे कलेक्टरसाहेबांस यादी लिहिली कीं, माझ्या पश्चात् ह्या वज्रेश्वरीसंस्थानाची वहिवाट बळिरामगिरी यांनीं करावी. ह्या त्यांच्या पत्रानें बळिरामगिरी हे वज्रेश्वरीसंस्थानांत सन १८७२ सालीं गेले. तेव्हां त्यांचें वय १० वर्षांचें होतें. संस्थानांत जसे हे गेले तसे ह्यांची आत अंबाबाई (ह्या संबंधांत ह्यांची आई) ती ह्यांच्याशीं वाईट बुद्धीनें वागूं लागली. वाईट वाईट माणसांच्या सल्ल्यानें नानाप्रकारचीं कुलंगडीं उत्पन्न करून, बळिरामगीर माझा दत्तक नाहीं, यास्तव त्याला वहिवाटदार करूं नये, वगैरे भान-

गडी तिनें कोर्टापर्यंत नेल्या. पण कै० रामचंद्रगिरी ह्यांचें पत्र कलेक्टरास गेलेलें तें जेव्हां कोर्टांत आलें तेव्हां अंबाबाईचे वेदमंत्र सरले. ह्या सर्व कामांत बळिरामगिरी ह्यांच्या साह्यास त्यांचे जनक जोगिंद्रगीरबोवा होते. ह्या जोगिंद्रबोवांनीं बळिरामगिरी ह्यांस नासिक एथें ठेवून ह्यांच्या अभ्यासक्रमांत व्यत्यय न येऊं देतां आपल्या दुकानावर माधवराव नांवाचे कारकून ठेवून अंबाबाईच्या भांडणाकरितां भिवंडी, ठाणें, मुंबईपावेतों सर्व कोर्टांत दावा जिंकून बाईस हयातीपावेतों अन्नवस्त्र देण्याचा ठराव करून बळिरामगिरी ह्यांस सन १८८० सालीं वज्रेश्वरीसंस्थानचा अधिकार मिळाला. ह्या वादाच्या परिणामामुळें श्रीवज्रेश्वरीस नेसावयास पांढऱ्या पातळाची पंचाईत! मग नाकांतल्या नथेविषयीं गोष्ट कशाला पाहिजे! मठांत झाडावयाच्या कुंचाची अडचण, मग पाणी पिण्यास तांब्या व भोजनास ताट कोठून आणावें? बसावयास शिंदीच्या फडांची चटई मिळण्याची मारामार! मग सत्रंजीगादीची गोष्ट तर दूरच! अस्ताव्यस्त स्थितींत फक्त काय ती मठाची इमारत व श्रीजगदंबेचें संस्थान ह्या आमच्या बळिरामगिरीबोवांच्या स्वाधीन केलें! कर्जाचा बोजा पाटीभर डोकीवर ठेवून अंबाबाई परलोकवासी झाल्या.

वज्रेश्वरीसंस्थान ताब्यांत आल्यावर जोगिंद्रगिरीबोवांनीं अश्रांत परिश्रमानें बळिरामगिरीबोवांच्या क-

र्जांची कमी करण्याची तजवीज केली. जहागीरदारीस समयानुसार रजा देऊन साधा बेत ठेविला. गाडी, घोडे, गाई, ह्मशी, जशी जशी वेळ येईल तशा तशा प्रसंगास घेऊन संस्थानचें कर्ज निवारण केलें. संस्थानच्या ६ गांवांतील जंगल तोडवून एकदम पुष्कळ रक्कम हातांत राहील अशी तजवीज ठेविली. अशी पुत्रवात्सल्यानें मेहनत करून जोगिंद्रगिरीबावांनीं शके १८०७ ह्या सालीं श्रीवज्रेश्वरीसन्निध देह ठेविला. ह्यांच्या श्रमानें वज्रेश्वरीचें संस्थान चांगल्या स्थितींत आलें.

हल्लीं ह्या संस्थानची स्थिति फारच उत्तम आहे. श्रीदेवीस त्रिकालपूजा, नैवेद्य, धूप, दीप इत्यादि राजोपचार नियमित होऊन चार नंदादीप सर्वकाळ असतात. संस्थानाच्या सोईकरितां वेगळी कचेरी, बैठकीची जागा, कोठी, देवडी इत्यादि नवीन इमारती तपोनिधि बळिरामबावांनीं करून उत्तम व्यवस्था ठेविली आहे. संस्थानच्या व्यवस्थेसाठीं १ दिवाण, १ कारकून, १ मदतनीस, २ शिपाई, १ पुजारी गोसावी, १ मराठा, इतर गडीमाणसें ह्याप्रमाणें आहेत. श्रीवज्रेश्वरीस चिंचपेटी, मोत्यांचें पेंडें आणि पुतळ्यांच्या माळा ह्या श्रीमंत गायकवाडसरकारांनीं दिल्या आहेत. ह्या संस्थानिकांनीं खऱ्या मोत्यांच्या ३ नथा तिन्ही मूर्तींस केल्या आहेत. शिवाय लहान लहान डागिणे, लुगडीं, पातळें, पैठण्या, पूजेचीं चांदीचीं भांडीं इत्यादि सामान उत्तम व्यवस्थेनें ठेविलें असून श्रीच्या

मूर्तीस मुगुट करण्याकरितां सिद्धता आहे. ह्या कामाकरितां नासिक एथील कुशल स्वर्णकार रा० रामचंद्र रावजी शेट यांस मूर्तिदर्शनार्थ मुद्दाम वज्रेश्वरीस एक महिन्यापूर्वीं नेलें होतें.

संस्थानाकडे हल्लीं इतके नौकरलोक असून शिवाय आप्तमंडळी, जातीची मंडळी, ह्यांचा जमाव पुष्कळ आहे. बळिरामगिरी ह्यांचे पूर्वघरचे बंधु विठ्ठलगिरी जोगिंद्रगिरी हे ह्यांच्याजवळ असून बंधुप्रेम तिळभर कमी झालेलें नाहीं. हे गृहस्थ २७ वर्षांचे आहेत. चांगले बोलके आहेत. समयोचितपणा चांगला दिसला. मीं त्यांना विचारलें, नाना, ह्या आपल्या वज्रेश्वरीस परीट नाहीं काय? तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें "धोबी बैठे क्या करेंगा दीगांबरके गांव" ह्या त्यांच्या प्रसंगोचित बोलण्याचें मला कौतुक वाटलें.

वज्रेश्वरीसंस्थानाकडे आल्या अतीतास, वैराग्यास, पांथस्थास, फकिरास सदावर्त चालू आहे. कोणीही येवो, त्यास गुजाऱ्यापुरती खिचडी प्रत्यहीं मिळते.

वज्रेश्वरीची अर्चा शके १८०९ सालीं बळिरामबावांनीं नासिक येथून वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणमंडळी नेऊन यथाशास्त्र केली. ह्या अर्चेस कमींत कमी पांच हज़ार रुपये लावून श्रीदेवी संतुष्ट केली.

वज्रेश्वरीसंस्थानांत हल्लीं गाई, ह्मशी, घोडे, बैल, गाड्या, वगैरेचा बिलकुल कमीपणा नसून व्यवस्था चांगली अ-

सून संस्थानिक निगर्वी, साधे, सद्यसनी, लिहिणारे, वाचनेच्छु असे आहेत. सहा वर्तमानपत्रें, तीन मासिक पुस्तकें हे घेतात. पण वर्तमानपत्रें, नुसतीं नांवास घेऊन घरांत पुड्या बांधण्यांत ते कागद देणारे नाहींत; तर पत्रें आलीं कीं तीं वाचून नंतर फैलीस लावून संग्रहीं ठेवणारे आहेत.

वज्रेश्वरीचे मुख्य संस्थानिक हे फर्ड्या कारकुनासारखे मराठी लिहिणारे असून हिशेबी कामांतही फारच हुशार आहेत. आल्यागेल्यांचा सत्कार करणें, योग्य तजवीज ठेवणें, गोड बोलणें, योग्य मनुष्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें मदत करणें, हें त्यांच्या आंगवळणीं पडलें आहे. ह्यांना ह्या सर्व कामांत त्यांचे कनिष्ठ बंधु विठ्ठलगिरी ह्यांची मदत विशेष असते. ऐन तारुण्याचा भर असून जो पुरुष रंडीबाजीपासून दूर रहातो तोच खरा महंत व तोच खरा गोसावी. ह्याप्रमाणें बळिरामगिरींची वागणूक ह्या विषयापासून दूर रहाण्याची मला दिसली. अशीच वागणूक ह्या रंडीब्रांडीपासून राहिल्यास संसारांत चांगलें ह्मणवून घेण्याची वेगळी शिफारस नको आहे. हीं दोन व्यसनें ज्यांच्या आंगांत पूर्णपणानें वास करितात, ते नरपशु प्रसंगीं काय काय न करतील बरें ? एक ब्रांडी किंवा दुसऱ्या प्रकारची दारू कोणीही मनुष्य पिऊं लागला कीं, तो त्या दारूच्या योगानें पंचमहापातक्यांतील अग्रगण्य होतो. मग काय ! जाति नाहीं ! धर्म नाहीं ! कर्म नाहीं ! कोणाच्याही हातचें तो खाईल, कोठेंही तो जाईल, व

वाटेल तें करण्यास तो प्रवर्तक होईल. ह्यास्तव अशा व्यसनांतून आमचे बळिरामबावा दूर आहेत, हें फार चांगलें आहे. ह्यांची रहाणी साधारण आहे. डामडौल किंवा गाडीपुढें शिंग वाजविणें, स्वारांचे घोडे गाडीमागें दौडविणें, हें त्यांना अगदीं खपत नाहीं. निगर्वीपणानें ह्या वज्रेश्वरीची सेवा करून संस्थानची वहिवाट उत्तम प्रकारची ठेविली आहे. ह्यामुळें आह्मांस मोठें भूषण व फार आनंद वाटत आहे.

**वज्रेश्वरीची यात्रा**—शारदीय नवरात्र व वासंतिक नवरात्र ह्या प्रत्येक नवरात्रांत वज्रेश्वरीची यात्रा भरते. परंतु मोठी यात्रा प्रत्येक वर्षी चैत्र वद्य ११ पासून वैशाख शुद्ध प्रतिपदेपर्यंत असते. ह्या पांच दिवसांत हजारों यात्रा जमते. ही पांचच दिवस राहते असें नाहीं, पर्जन्यकाळाचा आरंभ होईपर्यंत ही यात्रा असते. त्यांत पांच दिवस यात्रेचा मोठा भर असतो. ह्या यात्रेंत व्यापाऱ्यांचीं दुकानें अजमासें चारशेंपावेतों येतात. तशाच गाड्या, छकडे, तांगे इत्यादि वाहनें ५००० पावेतों जमतात. मनुष्यसंख्या अजमासें तीस चाळीस हजारपावेतों होते. पाणी प्यावयास ९ विहिरी व तलाव असून स्नानाकरितां तर ईश्वरानें आयतीच उष्णोदकाची सोय करून ठेविली आहे. तें उष्णोदक कधीं संपावयाचें नाहीं व कोणत्याही ऋतूंत कधींही थंड व्हावयाचें नाहीं. अशी जगद्वंद्य परमेश्वरानेंच योजना करून ठेविली आहे.

यात्रेंत दररोज देवीस राजोपचारपूजा होऊन दर्शनाची अतोनात गर्दी जमते. ती गर्दी इतकी कीं, बंदोबस्ताकरितां दरवर्षी पोलिसचे लोक पन्नास येत असतात. ह्या लोकांची व इतर गुणी लोकांची जेवणाची व्यवस्था वज्रेश्वरी संस्थानांतून होत असते. ह्या यात्रेंत शेंकडों लोकांचे नवस वगैरे असतात. पूर्वी बगाड (गळ) टोंचून घेणें हे कडक नवस होते. ते हल्लीं कायद्यानें बंद केले आहेत. यात्रेंत दररोज रोषनाई देवीच्या देवालयांत आणि समोर होऊन दारूकामही पाहाण्यासारखें सुटतें. छडीपट्टेवाले, आखाडेवाले, तमाशेवाले, गाणारणी, भजनी मेळे, आराधी, व आराधिणी ह्यांच्या झुंडी, मस्तवान पहिलवानांच्या कुस्त्या हे सर्व प्रकार रात्रंदिवस चालून प्रेक्षकांस ज्याची ज्याविषयीं प्रीति, त्याला त्या त्या प्रकारांत तोष होऊन मोठी करमणूक होते. उष्णोदकाच्या कुंडांकडे ब्राह्मणांचे संकल्प, गोसाव्यांचे आशीर्वाद ह्यांची गर्दी होऊन जाते. उजाडल्याबरोबर पाउड आलारे आला ! दान आलेंरे दान आलें! ह्यांचे सूर, वासुदेवाच्या टाळांचा खणखणाट, देवीसमोरच्या चौघड्याचा दणदणाट, ह्यांच्या योगानें हा सर्व प्रदेश मोठा दुमदुमून जातो. देवीच्या देवालयांत जुन्या आर्त्या व भजन ह्यांचा थाट पाहून नास्तिक सुद्धां मान डोलवील अशी भावना होते. मग सज्जनाची गोष्ट कशाला ! देवी वज्रेश्वरी, रेणुका आणि कालिका ह्या तिन्ही रमणीय मूर्ति पाहिल्याबरोबर जशा आपणास

कांहीं विचारतील अशी भावना होते. यात्रेंत उत्पन्न जें होतें तें यात्रेच्या आलेल्या मंडळीच्या खर्चाकडेसच बहुधा जातें. यात्रस्थांत संभावित लोकांस उतरण्यासाठीं कैलासवासी जगन्नाथ शंकरशेट ऊर्फ नानासाहेब ह्या मुंबापुरस्थ गृहस्थांनीं दोनमजली धर्मशाळा बांधिली आहे. ती अद्याप दुरुस्त आहे. हिच्याच समोर उत्तरेस दुसरी एक धर्मशाळा रखमाबाई पाताणे प्रभु ह्या परोपकारी बाईनें बांधिली आहे. अशीं कामें करणारे लोक ह्यांचे देह जातात, परंतु परोपकारार्थ केलेलीं कृत्यें ह्यांच्या योगानें ते लोक जोंपर्यंत त्यांचीं कृत्यें कायम तोंपर्यंत ते लोक जीवमान आहेत, असें सर्व लोक ह्मणतात. ह्यासाठीं थोर लोकांनीं निपुत्रिकांस आठ पुत्र दिले आहेत तेः—

" तटाकं धननिक्षेपं लोकस्थाप्यं शिवालयं ॥
आरामक्रतुकूपाश्च संतानाष्टं प्रकीर्तितः ॥ १ ॥

पहा बरें, कैलासवासी श्रीमंत अहल्याबाई होळकर ह्यांचे कितीतरी पुत्र बदरिकाश्रमापासून सेतुबंधरामेश्वरापर्यंत जीवमान आहेत ! सवाशें वर्षें झालीं, परंतु अहल्याबाई ह्या आबालवृद्धांपर्यंत सर्व आर्यवासी जनांस ठाऊक आहेत; ह्याचें मुख्य कारण निरपेक्ष धर्मवासना. ह्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं !

चैत्र वद्य एकादशीपासून यात्रा भरून वद्य ३० रोजीं अतिशय दाटी होते. वैशाख शुद्ध १ रोजीं श्रीदेवीची पालखी मिरवून तें दर्शन घेऊन मग यात्रेंतील लोक गांवो-

गांव जाण्यास तयार होतात. मात्र जे व्यापारी व पदार्थ वगैरे विकण्यास आलेले, व ते पदार्थ घेणारे ह्यांचा क्रम पर्जन्य पडेपर्यंत चाललेला असतो.

यात्रेंत हजारों लोक येऊन त्या समयीं हें सर्व क्षेत्र मनुष्यमय होऊन जातें. हलवाई, वाणी, सराफ, बोहरी, फळफळावळवाले, भाजी विकणारे, माळी, तेली, तांबोळी; सोनार, शिंपी, गुजराथी, पटवेकरी, सुतार, लोहार, विड्या विकणारे, पागोटीं, टोप्या, कुंच्या वगैरे आयतीं सनगें तयार करून विकणारे, ओतारी, कातारी, कांसार, तांबट, वगैरे व्यापारी ह्यांच्या दुकानांच्या रांगा लागून राहतात. घडशी, वाजंत्री, ताशेमर्फेवाले, शिंगाडे, तुतारे ह्यांच्या वाद्यांचे कर्णमनोहर स्वर सर्व दिक्प्रांत दणाणवून सोडतात. वासुदेव, पांगुळ, ढोंगी, धुतारे, गोंधळी, तुतारे ह्यांच्या समेळ टाळादिकांनीं प्रातःकाळपासून एकच गर्दी होऊन जाते. यात्रस्थांपाशीं वासुदेवाचें दान मागणें, जोगिणींचा जोगवा मागणें, ह्यांची सदोदित धुमश्चक्री चालते. वासुदेवास पैसा, आणा मिळाल्यावर स्वांगाभोंवतीं गिरक्या मारून पाउडपावल्याचा पाडा वाचणें इत्यादि चालू असतें. नवस फेडण्यास आलेले लोक, कोणी निंब नेसून, कोणी मूकव्रतानें, कोणी दंडवत घालीत, वाद्याच्या गजरानें जगदंबमंदिरांत नवस फेडण्यास जातात. अशी एकच गर्दी पाहून प्रेक्षकांतःकरण तल्लीन होऊन जातें. यात्रेंत बहुधा कोंकणच्या प्रजेचा

भरणाच असतो. त्यांच्या त्या पोषाखाची चमत्कृति म्ह-णजे सोळा हात लांबीचें जरी लुगडें स्त्रीवर्ग नेसला तरी जसा पहिलवानानें लंगोट कसावा ह्याप्रमाणें त्या लुग-ड्याची स्थिति होते.

पुरुषांचा पेहराव तर ह्यापेक्षां विलक्षण ! कोंकणचे पाटील लोक म्हणजे घांटावरचेच मराठे; परंतु शें दोनशें वर्षांच्या सुमारास उदरपोषणनिमित्यें कोंकणची वस्ती करून हल्लीं कोंकणचे पाटील बनलेले आहेत. हे पाटील चांगले उत्पन्नदार असतात. त्यांना आपल्या पोषाखाची सुधारणा करितां येणार नाहीं, असें नाहीं. पण देशसं-प्रदाय ! पाटील लोक बहुधा ब्राह्मणी पागोटें घालितात. एक अंगरखा किंवा कोट व कंबरेच्या कडदोऱ्यास संसा-राच्छादनापुरती लंगोटी ! कां, ब्राह्मणी पागोट्याचें कसें मा-तेरें केलें पहा ! ह्यासाठीं ह्या पाटील लोकांनीं ही ब्राह्मणी पागोटीं घालण्याची वाईट चाल सोडून देऊन मराठी चालीचीं पाटीलपागोटीं घालावीं, अशी त्यांस आमची विनंति आहे. असेच कोणी कोणी चैनी मराठे, माळी, वं-जारी, वगैरे ह्या ब्राह्मणी पगड्या वापरतात, तेंही अत्यंत लाजिरवाणें आहे ! ब्राह्मणांसारखी वाणी सुधारा, त्यांच्यासारखी विद्या करा, त्यांचें अनुकरण चांगल्या कामांत करा, पगडीनें ब्राह्मणपणा न येतां "डोमका-वळा ज्यानें मोराचीं पिसें अंगास लाविलीं" ह्या इसाप-नीतींतील गोष्टीसारखी, ही थडी ना ती थडी, असें कां करितां ?

मराठे लोकांशिवाय जे कोंकणी, वारली, कोळी, ठाकूर, कातकरी वगैरे लोक येतात, त्यांची तर गोष्टच बोलावयास नको आहे. प्रसंगोपात पुरुषाच्या लंगोटीइतकी चिंधी स्त्रिया नेसतात !!!

**संस्थान वज्रेश्वरीचे प्रथम संपादक**—सुमारें तीनशें वर्षांपूर्वी देवगिरीबावा नांवाचे तपोनिधि महंत ह्यांनीं हें संस्थान संपादन केलें. हे बावा मोठे कडकडीत वैराग्यशील असून सत्पुरुष होते. हे ज्याप्रमाणें बोलत त्याप्रमाणें वागत असत; ह्यामुळें ह्यांची मोठी कीर्ति होऊन वज्रेश्वरीसंस्थान त्यांना शके १६०० च्या सुमारास मिळालें. हे बावा आमरणांत ब्रह्मचर्यव्रतानें होते. त्यांच्या पाठीमागें ९ पुरुषांपावेतों ही गादी ब्रह्मचर्य सांभाळूनच होती; पण पुढें ह्या गादीस ब्रह्मचर्यव्रताचा भार असह्य होऊन ह्या गादीवरील पुरुष गृहस्थाश्रमधर्मानें वागूं लागले. हल्लींचे गादीवरील पुरुष हे देवगिरीबावापासून नववे आहेत; ह्मणजे तीनशें वर्षांत नऊ पिढ्या झाल्या. साधारण मानानें पंचवीस वर्षांत एक पिढी होते. परंतु ह्या गादीवर पांच पुरुष ब्रह्मचर्यव्रताचे असल्यामुळें त्या पांच पुरुषांनीं २०० वर्षें गादी चालविली; व ह्या १०० वर्षांत हे चवथे पुरुष सांप्रत तपोनिधि बळिरामगिरी आहेत. ह्याप्रमाणें हें संस्थान तीनशें वर्षें ह्या तपोनिधि गिरीघराण्याच्या ताब्यांत आलें आहे. तीनशें वर्षांपासून हकीकत कळते; नाहींपेक्षां त्याच्याही पूर्वीं हें संस्थान ह्या

तपोनिधींच्या स्वाधीन आहे. आतां हें संस्थान जावत्कालपावेतों ब्रह्मचर्यव्रतानें चालणाऱ्या सत्पुरुषांकडे होतें, तावत्काल एकेक पिढी सुमारें पन्नास वर्षें चालत आली. पण जसें ब्रह्मचर्य लोपून गृहस्थाश्रमी पुरुष ह्या संस्थानावर आले, तसतसें आयुष्यमान कमीच होत गेलें. वास्तविकच आहे, ब्रह्मचर्य हें आयुष्यवर्धनाचें मुख्य साधनच आहे. महाभारतांत पूर्णप्रतापी इच्छामरणी भीष्माचार्य ह्यांचा पराक्रम वाढून प्रसंगीं श्रीकृष्णमहाराजांस हातीं शस्त्र धरण्याचा प्रसंग आणिला. हें ब्रह्मचर्याचेंच फळ आहे. ह्याचप्रमाणें श्रीकार्तिकस्वामी, मारुती, शुकाचार्य, ह्या सत्पुरुषांच्या ब्रह्मचर्याचे पवाडे आमचीं पुराणें गात आहेत. दोनशें वर्षांपूर्वीं होऊन गेलेले सत्पुरुष समर्थ श्रीरामदासस्वामी ह्यांच्या ब्रह्मचर्याचा प्रभाव सर्व महाराष्ट्रीय जनांस विदित आहे.

**वज्रेश्वरी संस्थानिकांस विनंति**—आतां ह्यासंबंधानें आह्मांस ह्या वज्रेश्वरीच्या संस्थानिकांस एक विनंति करावयाची आहे ती अशी कीं, जर श्रीवज्रेश्वरीच्या कृपेनें ह्या संस्थानिकांस औरसपुत्र झाले तर त्यांत जो निःसीम ब्रह्मचर्यानें राहील, त्यानें ह्या संस्थानची "महंताई" करावी, व त्याजकडून तसें वर्तन न झालें तर असें वर्तन ठेवणाऱ्या योग्य शिष्यास महंत नेमावें. अशा प्रकारची वहिवाट झाल्यास श्रीदेवीच्या सेवेवांचून इतर व्याप संस्थानचेमागें लागणार नाहींत. पहा बरें, जेथें

संसारदुःखच नाहीं तेथें ईश्वरी सेवन कसें निर्वेध होतें! नाहींपेक्षां,

"मूर्खांमाजी परम मूर्ख ॥ जो संसारीं मानी सुख ॥
संसारदुःखायेवढें दुःख ॥ आणिक नाहीं ॥ १ ॥"

ह्या समर्थांच्या ओवीप्रमाणें जेथें संसार तेथें सर्व दुःखें पूर्णपणें वसतात. कारण, लाभ, मृत्यु, हानि इत्यादि वारंवार होणारे प्रसंग पाहून हर्ष, शोक, खेदातिशयानें मनुष्याची बुद्धि अस्थिरत्व पावून त्याजकडून परमेशसेवन योग्य होत नाहीं.

ह्यासाठीं हें संस्थान जसें पूर्वीं ब्रह्मचर्य पालन करणारांचे हातीं होतें, तसेंच ह्यापुढें चालण्याची व्यवस्था व्हावी; पण नुसतें ब्रह्मचर्याचें सोंग घेऊन

"किरवाहै एक नीमका चाखत चाहे खांड,
मन तो धरे बेरागमे घरमे रखिये रांड."

ह्या भगवद्भक्तांच्या वाणीप्रमाणें प्रकार झाल्यास अशा ब्रह्मचाऱ्यांपेक्षां सहस्रपट संसारी चांगले! हेंही पण त्यांनीं लक्षांत वागवून योजना करावी, अशी सविनय प्रार्थना आहे.

## वज्रेश्वरीस शके १८२० सालीं केलेलीं नवीन कामें.

मीं हें चरित्र लिहून तें वज्रेश्वरीच्या महंतांस दिलें. परंतु प्लेगच्या त्रासामुळें हें छापण्यांत आजपर्यंत आलें नाहीं. सरासरी एक वर्षांत वहिवाटदार महंतानीं पुष्कळ

कामें केलीं. ह्मणजे तटाची दुरुस्ती केली. हा तट ह्मणजे किल्ल्यासारखा मजबूत आहे. हें मीं वर सांगितलेंच आहे. परंतु पुष्कळ वर्षांचा असल्यामुळें जागजागीं थोडा नादुरुस्त झाला होता, तो दुरुस्त केला.

महाद्वारापासून खालीं उतरण्याच्या पायऱ्या ह्या कै० श्रीमंत नानासाहेब चांदवडकर ह्या धर्मात्म्यांनीं केल्या होत्या, त्या जागोजाग अतिवृष्टीनें नादुरुस्त झाल्या होत्या, त्याही दुरुस्त केल्या. आतां पुनः पायऱ्या आणि तट हीं दोन्ही कामें नवीन कामासारखीं झालीं.

धर्मबुद्धि आणि परोपकार हीं ज्याच्या मनांत खऱ्या रीतीनें वास करितात, त्यास ईश्वर खरोखर यश देतो. ह्या ह्मणण्याची प्रचीति आणखी दोन कामें नवीन केलीं त्यावरून दिसून येते.

पाणी पिण्याची अडचण जाणून आणखी दोन आड खणावे, असें बळिरामगिरी ह्यांनीं मनांत आणून ते दोन आड खणविले. त्यांत भर वैशाख महिन्यांत एका आडास अठरा फुटांवर ह्मणजे सरासरी बारा हातांवर उत्तम पाणी लागलें. दुसऱ्यासही त्याचप्रमाणें मुबलक पाणी लागून पिणाऱ्या लोकांस सुखावह झालें.

माझ्या विनंतीस संस्थानच्या वहिवाटदारांची संमति मिळाली, असें मला हें पुस्तक छापण्याच्या अगोदर ह्मणण्याचा प्रसंग आला, हें मोठें सुदैव आहे, असें मी समजतों. कारण, ही गादी ब्रह्मचाऱ्यानें चालवावी ह्या उद्देशानें

वहिवाटदार ह्यांनीं नवीन मठ बांधिला. त्या मठांत महंत मठाधिपति पूजाधिकारी ह्यांनींच अगदीं तुटक रहावें, अशी योजना करून योग्य पुरुष मिळाल्यास त्यास तेथें स्थापावें, असा त्यांचा हेतु दिसतो. तसेंच संस्थानचे वहिवाटदार ह्यांनीं स्वतंत्र राहून मठाधिपतीस कोणताही उपसर्ग न लागावा अशी योजना केली आहे.

वर सांगितलेल्या कामांस दोन तीन हजार रुपये ह्या वर्षीं खर्चून हीं कामें केलीं, हें फार चांगलें झालें. ह्या वर्षीं आणि मागचे वर्षीं प्लेगरोगामुळें वज्रेश्वरीची यात्रा सरकारांनीं भरूं दिली नाहीं; ह्यामुळें सरासरी दोन तीन हजार रुपयांचें नुकसान झालें. तरी व्यवस्थितपणाच्या खर्चानें त्यांतले त्यांत वरचीं कामें झालेलीं पाहून कोणीही वहिवाटदारांची स्तुति करील.

असो, हें पुस्तक श्रीजगदंबेच्या कृपेनें शेवटास गेलें. तिच्या चरणीं अनन्यभावें मस्तक ठेवून आमच्या सर्व देशबांधवांस लीनपणानें प्रणामरूप रामराम करून त्यांची आज्ञा घेऊन पूर्ण करितों.

## पूर्वभाग समाप्त.

# श्रीवज्रेश्वरीचरित्र.

## उत्तरभाग.

### भाग पहिला—कैलासवर्णन.

श्रीभारद्वाजऋषि एके समयीं तीर्थाटण करीत असतां त्यांची व श्रीवेद्व्यासांची गांठ पडली. व्यासांस भारद्वाज ह्मणाले कीं, मीं पूर्वीं अनेकविध तीर्थें पाहिलीं. द्वादश ज्योतिर्लिंगांची पूजा केली; अयोध्या, काञ्ची, मथुरा, माया, वाराणशी, द्वारकादि सप्तपुऱ्या पाहिल्या. सर्व सिद्धक्षेत्रें जितकीं ह्या पृथ्वीतलावर आहेत तितकीं पाहून त्या त्या क्षेत्रांत त्यांच्या महात्म्यानुरूप दानें केलीं; कृष्णा, वैतरणी, गंगा, यमुना, सरस्वती, कावेरी, नर्मदा, मही इत्यादि नद्यांचीं स्नानें करून त्यांच्या कांठीं वास केला; इष्टहेत्वर्थ विविध यज्ञ, व्रतें इत्यादिकांचें सेवन केलें; अनेक पुराणें ऐकिलीं; नित्यशः इतिहासांचें श्रवण केलें; श्रीकेदारास जाऊन गंगोत्रीचें जलपान केलें; सप्तगोदावरी प्रांतांत जाऊन समुद्रसंगमाच्या ठिकाणीं स्नान केलें; अनेकविध शास्त्रांचें पठण केलें; बहुविध मंत्रतंत्रादिकांचें साधन केलें; परंतु माझें अंतःकरण ह्या सर्व कृत्यांनीं अद्यापि समाधान पावलें नाहीं. ह्यास्तव आपल्या मुखानें श्रीवज्रेश्वरीदेवीचें माहात्म्य श्रवण करावें असें मी इच्छितों. कारण जी आदिशक्ति, महामाया, विश्व-

व्यापिनी ह्या भूतलावर अवतीर्ण होऊन तिनें कलिकाल, वज्रासुरनामक दैत्यांचें हनन करून, महातपोधन ऋषि व देव ह्यांना आश्वासन देऊन त्यांचें संरक्षण केलें; ह्मणून अशा श्रीजगदंबचरित्राचें श्रवण आपल्या मुखानें व्हावें, ही माझी फार इच्छा आहे; ती आपण पुरविल्यास मजवर आपला प्रसाद होईल. हें श्रीभारद्वाजऋषींचें वचन ऐकून श्रीव्यास ह्मणाले—

पूर्वीं द्वापारयुगाचे शेवटीं उग्रासुरनामक मोठा दारुण योद्धा शस्त्रविद्याविशारद व मोठा तेजस्वी होता. त्याचा एक पुत्र सिंहमार नांवाचा उदार बुद्धीचा होता; त्याचा धाकटा भाऊ जो होता तो मोठा युद्धकलेंत प्रवीण असून संग्रामांत सिंहासारखा तेजस्वी, व आपल्या शत्रूंस मोठा भयप्रद वाटत असे. त्याचें नांव कलिकाल असें होतें. त्याच्या त्रासामुळें सर्व देव दाही दिशांस पळूं लागले. इंद्रानें भयभीत होऊन उत्तरदिशेकडे पळ काढिला. अग्नि, यम, निर्ऋति, वायु, वरुण, ईशान, कुबेर इत्यादि देव त्या दैत्याची सेवा करिते झाले. वायु मंदगतियुक्त वाहूं लागला, चंद्रसूर्य परिमित प्रकाशूं लागले, यमधर्म थरथरां कांपू लागला, अग्नि हा आपली उष्णता लोपवून शीतता धारण करूं लागला. कुबेरानें दारिद्य स्वीकारिलें. त्या कलिकालाच्या त्रासामुळें कोणालाही सुख ह्मणून नव्हतेंच. सर्व तपोधन ऋषि भयकंपित होऊन गिरिगव्हरांत लपून राहिले. योगीजनांनीं योगाभ्यास सोडून ते वाणिज्यादि व्यापार करूं लागले.

इकडे कलिकालानें मोठमोठ्या यज्ञांचा विध्वंस केला. ह्याप्रमाणें पृथ्वीतलावरील यज्ञविध्वंसनानंतर स्वर्गनाथ इंद्राच्या यज्ञविध्वंसनास्तव तो कैलासपर्वतावर श्रीशंकर प्रसन्न होण्याकरितां तपश्चर्या करण्याकरितां गेला.

भारद्वाजऋषि व्यासांस ह्मणाले, ज्यावर नाना देवता वास करितात; अनेक सिद्ध, साधक, मुनी राहतात; असा देवस्वरूपी जो कैलास तो कशा प्रकारचा आहे, हें कृपा करून मला आपण सांगा. हें ऐकून व्यासांनीं त्या कैलासपर्वताचें वर्णन केलें. तें असें:—व्यास ह्मणाले, कैलासनामक विख्यात पर्वतेश्वर मोठ्या उंच शिखरांनीं युक्त, नानाप्रकारच्या रत्नमय शृंगांनीं शोभायमान, सुवर्णरौप्यमय असा देवरूप धारण करून दिग्मंडळावर शोभत आहे. त्या पर्वतावर कोठें सोन्याची, कोठें रत्नमय अशी भूमि आहे. नानाप्रकारच्या धातु तेथें असून त्यायोगें पर्वत फारच शोभा देत आहे.

ज्या कैलासाच्या मध्यभागावर अनेक प्रकारच्या स्फटिकांतून नानाविध निर्झरप्रवाह वाहत आहेत; ज्या कैलासावर साक्षात् श्रीशिव गौरीसहवर्तमान वास करितात, अशा पर्वताची शोभा कितीतरी वर्णावी ? ज्या पर्वताव चहूंकडे वृक्षांची व वेलींची दाटी होऊन गेली आहे. लवंग, लतिका, वसंतऋतूंत फुलणारे मोगरे, जाई, जुई, केतकी, चंपक, चंदन, साग, शिसव, हेदी, कुंकुमागरु, पीतचंदन, ताड, शिंदी, अर्जुन, बेलांचे वृक्ष, फणस, आंबे,

तमालवृक्ष, निंब, बकुळी, जांभळी, जांब, केळी, कर्दळी, नारळी, सदाफळयुक्त सुपाऱ्या, कोशिंबांचीं झाडें, भूर्जवृक्ष, अनेकविध लिंबें, नारिंगें, देवदार, डाळिंबें, महाळुंगें इत्यादि वृक्षांची निबिड छाया पडून, जणू काय, सर्व कैलासपर्वत हिरवें वस्त्र परिधान करून बसला आहे. असें दिसत असे. ह्याचप्रमाणें त्या पर्वतावर कोकिला, कलहंस, राजहंस, चक्रवाक, चातक, चकोर इत्यादि पक्षी आपल्या मधुर स्वररूपी वाद्यांनीं प्रेक्षकांचीं अंतःकरणें मोहून घेत होते. तसेच सिंह, व्याघ्र, रानगवे, चितळ, सांबरें, हरणें इत्यादि पशु आपापल्या गुहांतून गर्जना करीत होते. वनवराह व वनगाई ह्या स्वेच्छ फिरून ह्या सर्व पशुसमुदायांत वैरभाव अगदीं दिसत नसे. ह्मणजे हरिणीचें पाडस वाघिणीनें पाजावें, व गाईचें वांसरूं सिंहिणीनें पाजावें, असा क्रम त्या पर्वतावर होता. तेथें सिद्ध, साधक, गण, गंधर्व, यक्ष, किन्नर, निर्मल मनाचे योगी इत्यादि अनेक तपसाधनें करीत.

अशा त्या कैलासपर्वतावर जो महाप्रतापवान्, मोठा बलिष्ठ, अतियोद्धा असा तो कलिकालनामक दैत्य प्राप्त झाला. त्यानें चार कोस लांबीची स्फटिकमय शिला सरोवरांनीं वेष्टिलेली अवलोकन केली. त्याला ती शिला पाहून असें वाटलें कीं, आपणास तपश्चर्या करण्यास हेंच स्थळ योग्य आहे; त्याप्रमाणें तो कलिकालदैत्य त्या शिलातलावर बसून, शंकराच्या ठिकाणीं आपलें लक्ष्य लावून, माझ्यावांचून दुसरा कोणी थोर नाहीं, अशा अ-

भिमानानें देवादिकांचा पराभव करीन, त्यांचे यज्ञ विध्वंसीन आणि इंद्रास जिंकीन अशा आशेनें तपश्चर्या करण्यास उद्युक्त झाला. ह्याप्रमाणें वज्रेश्वरीमहात्म्यांतील प्रथम अध्यायांत कथा वर्णिली आहे. ह्यास कैलासवर्णन ह्मणतात.

---

## भाग दुसरा—इंद्रादि देवांचें पलायन.

भारद्वाज श्रीव्यासांस ह्मणाले, त्या कलिकालदैत्यानें कैलासपर्वतावर आपलें मन निश्चल करून, दयानिधि शंकरास कसें वश केलें? शंकरांनीं त्यास कोणते वर दिले? तें सर्व मला आपण सांगा. हें भारद्वाजऋषींचें वाक्य ऐकून श्रीव्यास ह्मणाले, ऐका:—तो कलिकालदैत्य बारा वर्षें उपोषण करून राहिला; साठ वर्षें पायांच्या अंगुष्ठांवर उभा राहून, चोवीस वर्षें इंद्रियें स्वाधीन ठेवून त्यानें दुग्धाहार केला. पुनः साठ वर्षें मौनव्रत धरून, बारा वर्षें हातापायांचीं नखें वाढविलीं. सोळा वर्षें शुद्धाचरणानें ऊर्ध्वबाहुव्रत केलें. हजार वर्षेंपर्यंत एकसारखा शिव नामाचा जप केला. असा त्या दैत्याचा तपःप्रभाव झा त्यावर सर्व जग कंपायमान झालें. सर्व हाहाःकार झा पुढें काय होईल हें सांगवत नाहीं असें ह्मणूं त्या वेळीं तो दयाळू सदाशिव प्रत्यक्ष त्या कलि त्याच्या पुढें प्रगट होऊन त्यास ह्मणाला—हे निश्च वर माग, वर माग. हें शंकराचें वचन ऐकून दैत्या उघडून शंकराचें मुख अवलोकन केलें; व प्रेम-

स्तुति करूं लागला. दैत्य ह्मणाला—हे शंभो, हे महारुद्र, हे चंद्रार्धशेखर, हे गौरीपते, आज माझा जन्म आणि तपस्या सफल झाली. कारण तूं सर्व जगतावरील मनुष्यांचा, देवांचा आणि ऋषींचा गतिदाता आहेस. तुझ्याच आधीन हें सगळें चराचर आहे. तुझ्या दर्शनानें आज मी कृतार्थ झालों आहें. तूं एखाद्यास थोडें जरी देशील तरी तें देणें त्यास सर्वकाल सुखप्रदच होईल. आतां मजवर जर तूं प्रसन्न झालास तर मला हजार भुजा, त्याप्रमाणें महान् भयंकर राक्षसांची चतुरंगसेना दे. मला अनेक शत्रूंनीं जरी समरभूमींत गांठिलें, व ते शत्रु इंद्रादिदेव जरी असले, तरी त्यांच्यापासून माझा पराजय न व्हावा. ऋषींचा शाप मला न बाधावा. मी सर्व ऋषींचे यज्ञ विध्वंसीन. मला सर्व भुवनांपेक्षां विशेष बल दे. मजवर देवादिकांनीं टाकिलेलीं शस्त्रास्त्रें विफल होऊन तीं शस्त्रास्त्रें मी सबंध गिळून टाकीन ही मला शक्ति दे. हे शंकरा, जर तूं मजवर प्रसंन्न आहेस, तर हे वर सांगितलेले सर्व वर मला कृपाळू होऊन दे. हें दैत्याचें भाषण ऐकून गिरिजारमण शंकर बोलला—हे भक्ता, तुला युद्धाचे समयीं सहस्रबाहु देऊन मागितलेले सर्व वर दिले आहेत. असें बोलून शंकर तेथून अंतर्धान पावला.

शंकर अंतर्धान पावल्यानंतर मिळालेल्या वराच्या योगानें कलिकालदैत्य मोठा आनंदित झाला व पुढें त्या वरप्रभावानें तो लोकांना अत्यंत ताप देऊं लागला. त्यानें

अनेक दैत्यसेना जवळ बाळगल्या. तो दैत्य आपल्या सेनेसहवर्तमान मोठ्या आनंदांत असे. तो एक वेळ तुंगारण्यांत आला; तेव्हां ऋषिगणांनीं त्या दैत्यास शंकरानें वरप्रदान दिल्याचें वृत्त ऐकून फारच ते विव्हळ झाले, कीं न जाणों, आतां हा आपला समाचार घेईल असें त्या सर्व ऋषिगणांस वाटलें. ऋषींनीं, साधकांनीं, अग्निहोत्र्यांनीं आपापल्या आराध्यदेवतांच्या मुद्रा, विभूती, समिधा, कुश, स्मार्तपात्रें, स्त्रिया, मुलें, गाई, वांसरें घेऊन त्या दैत्याच्या भयानें गहन अशा अरण्यांत पलायन केलें. तो सर्व समूह क्षुधेनें, तृषेनें पीडित झाला. सर्व दिशांचे ठायीं जिकडे तिकडे हाहाःकार होऊन, पृथ्वी पर्वतांसह कंपित झाली. असा प्रकार झाला.

भारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, त्या वेळेस देव, ऋषिगण, कोण पळाले, त्यांचा नामनिर्देश कृपा करून मला सांगितल्यास मजवर आपले फार उपकार होतील. त्यांचें भाषण ऐकून व्यासोनारायण ह्मणाले, जे जे ऋषि, देव, इत्यादि पळाले त्यांचीं नांवें ऐकाः—कश्यप, जमदग्नि विश्वामित्र, गौतम, भारद्वाज, वशिष्ठ, गार्ग्य, पाराशर, वत्स, बाभ्रव्य, भृगु, कपिल, मांडव्य, अत्रि, शालाक्ष, मार्कंडेय, कर्दम, शातातप, शौनक, शांडिल्य, नंदन, च्यवन, दाल्भ्य, कुत्स, कौंडिण्य, नारद इत्यादि बहुत ऋषींनीं पलायन केलें. कोणी गृहस्थधर्मी ऋषी होते, त्यांनीं आपल्या स्त्रिया, पुत्रादिकांसह अरण्यमार्ग स्वीकारून स्वाश्रम सो-

डिले. इंद्रानें ऐरावतास सोडून पादचारीच पलायन केलें. भयभीत झाल्याच्या योगानें कोणी कोणी अतित्वरा करून एकेकटेच पळूं लागले. अग्निनारायण घामाघूम होऊन मेषावर बसून पळाले. उत्तरदिशेकडे पळावयास लागले तो प्रदेश तृणहीन होता. यमानें आपलें वेषांतर करून तो पळाला. सर्व ऋषि, देव हे त्या राक्षसाच्या भयानें भयाकुल होऊन नीच जनांसारखे स्वच्छंद पळूं लागले. सशावर वायूनें आरोहण करून तो पळाला. कोणी आकाशमार्गानें, कोणी गुप्तरूपानें पळाले. सर्व धर्माचें आदिकारण जें होमद्रव्य तें त्या कलिकालानें लुटिलें. कुबेरानें द्रव्याचा लोभ सोडून अश्वावरोहण करून पलायन केलें. दैत्याला वर देणारे जे शंकर ते सुद्धां आपल्या म्हाताऱ्या नंदीवर बसून पळाले. त्या वेळेस वस्त्र सुद्धां शंकरांच्या अंगावर नव्हतें. अशा स्थितींत ते गहन अरण्यांत आले. अश्विनीकुमार, सूर्य, चंद्र, विश्वेदेव, मरुद्गण, किंनर, यक्ष, गंधर्व इत्यादि सर्व देव, ऋषि त्या अरण्यांत एकवटून त्यांनीं दैत्यविध्वंसनार्थ आराध्यदेवतेची प्रार्थना करून यज्ञ केला. त्याप्रमाणें त्या यज्ञांतीं जगद्धात्री विश्वमाया, त्रैलोक्यपालिनी प्रत्यक्ष प्रगट झाली. तिला पाहून अतिहर्षानें इंद्रादिदेवांनीं व ऋषिगणांनीं त्या जगन्मातेची स्तुति केली. याप्रमाणें हा देवपलायननामक द्वितीय अध्याय समाप्त झाला.

---

## भाग तिसरा—श्रीजगदंबस्तुति.

### पद. (पंचतुंड०-ही चाल.)

श्रीजगदंबे नमन तुला हें सद्भावें आह्मी करितों ॥
तव गुणप्रेमामृत निजभावें सेवन करुनी सुख वरितों ॥ध्रु.॥
तूंच जगाची माय पाय हे तव भवतारण ही तरणी ॥
जुरे पातकध्वांत जई तव शौर्य वीर्य उगवे तरणी ॥
फार पीडिली कलिकालाच्या त्रासानें माये धरणी ॥
ह्या त्रासाच्या विमुक्ततेस्तव शरण तुझ्या आलों चरणीं ॥
गिरीकंदरीं जरि लपलों ह्या पृष्ठिं उभा दुष्टचि तरि तो॥
पुण्यमार्ग धन सर्व आमचें दुष्ट बळें स्वकरें हरितो ॥श्री०१॥

### श्लोक–शार्दूलविक्रीडित.

विद्यांची गति तूं तशीच सगळ्या लोकां गती सत्य तूं ॥
देहींची गति तूं ऋषि प्रमुख जे यांची गती अंब तूं ॥
शक्तींची गति तूं जगांत अवघ्या थोरांतही थोर तूं ॥
तूं हें संकट वारुनी झडकरी देईं सुखा आजि तूं ॥ २ ॥

### श्लोक–वसंततिलका.

तूं एक सत्य वरदा जगतांत माये ॥
उद्धारकारिणि दुजी जरि ती रमा ये ॥
नाहीं तुझ्यासम तरी भवसागरांत ॥
संरक्षि अंब कलिदुःखमहागरांत ॥ ३ ॥

### साकी.

सर्व चराचरगतिव्यापिनी पूज्य परा तूं शक्ती ॥
त्रयलोकीं आराध्यदेवता ध्यात्या देशी मुक्ती ॥
शोभसि ह्या जगतीं ॥ देशी निजभक्तां प्रगती ॥ ध्रु०॥४॥

**पद.** (वसंतीं बघुनि मेनकेला–ही चाल.)

राक्षसें बहुत ताप दिधला ॥
सर्व ऋषी इंद्रादि देवतागण दुःखित झाला ॥ ध्रु० ॥
पीडिलें अति ब्राह्मणांला ॥
गाई मारुनि चरचर कापी त्यांच्या वत्सांला ॥
विध्वंसिल्या यज्ञशाला ॥
भ्रष्टविल्या किति कलिकालानें अग्निहोत्रशाला ॥
कोणी निवारी न ज्याला ॥
हविर्भाग तो सुरां न देतां स्वयें भक्षि त्याला ॥
कितिक त्या हरुनि नेइ बाला ॥
स्थानभ्रष्टा करुनि देवता दैत्य मत्त झाला ॥ रा०॥१॥

**दिंडी.**

शंकरानें वरदान दिलें त्यास ॥
परी तोही पावला अतित्रास ॥
ह्मणुनि अंबे स्मरतसों तुझ्या पाया ॥
त्राहि त्राहि जगदंब महामाया ॥ ६ ॥

**ओवी.**

अपूर्वशक्ति त्रयलोकांत ॥ तूंच जगदंब साक्षात ॥
तुजवांचूनि अन्य दैवत ॥ ह्या भूवरी नसेचि ॥ ७ ॥

**श्लोक–अनुष्टुप्.**

खड्गिनी पाशिनी तूंच ॥ तूं करीं शरधारिणी ॥
चापिनी एकवीरा तूं ॥ महारात्री तपस्विनी ॥ ८ ॥

### श्लोक–कामदा.

कालरात्रि तूं मोहरात्रि तूं ॥
चातुरीयका तुष्टिदात्रि तूं ॥
पुष्टिदात्रि तूं प्रीतिदात्रि तूं ॥
हे परात्परे नित्य सत्य तूं ॥ ९ ॥
मानदा तशी कांतिसौख्यदा ॥
सर्वमंगला ज्ञानसिद्धिदा ॥
बुद्धिवर्द्धिनी सर्वशर्मदा ॥
यापरी तुझें वृत्त कामदा ॥ १० ॥

### पद. ( राजाहूमै कौमका–ही चाल. )

सर्व जनांची माता तूं तुजला ध्यातों आज ॥
सुरवर ऋषिवर रक्षुनियां राखिं आमची लाज ॥
जयदात्री तूं सर्वांची जयदा हें तव नाम ॥
सौम्यतरा श्री वंद्या तूं आद्यपीठ तव धाम ॥
तूं स्वाहा तूं स्वधाच तूं तूं सर्वां आराम ॥
सुबोधिनी तूं विधारिणी लोकत्रितयविराम ॥ ११ ॥

### दिंडी.

अमृताची चंद्रिका असिसि अंबे ॥
महातेजोमय मूर्ति तव सदंबे ॥
महाकालाच्या संकटीं तुझ्यावीण ॥
आमचा हा वारील कोण शीण ॥ १२ ॥

लेखश्री

### साकी.

कामद्वीप निवासस्थल हें अंबे तव जन वदती ॥
वरदायक तूं सर्व सुरांची ह्या असुरांची शास्ती ॥
पीडित विश्वातें ॥ तारीं तारीं तूं माते ॥ ध्रु० ॥१३॥

### अंजनीगीत.

दैत्यानें बहु पीडा दिधली ॥ देवांची धुळधाणी केली ॥
इंद्राचीही महती हरिली ॥ पहा पहा माये ॥ १४ ॥

### ओवी.

घेतले देवांचे अधिकार ॥ कोणी न करी यत्प्रतिकार ॥
तूं देवी होय मेघाची धार ॥ चातक आह्मी तवाग्रीं ॥१५॥

### श्लोक–शुद्ध कामदा.

तव दयामृता वर्षवीं त्वरें ॥
विष हरीं कृपें लोकसुंदरे ॥
हरण तूं करीं दुष्ट आपदा ॥
कृतिहि दाखवीं शुद्ध कामदा ॥ १६ ॥

### श्लोक–शिखरिणी.

भवानी तूं सर्वां सुखकर करीं वेळ जयदे ॥
ऋषी देवां विप्रां जननिसम सर्वांस सुख दे ॥
वधोनीयां दैत्यां सुजनजनिं हो सौख्यकरिणी ॥
सुभोक्त्या विप्रांना तव यश गमे ही शिखरिणी॥१७॥

### श्लोक–शार्दूलविक्रीडित.

श्रीदेवी वरदे तुझ्याविण दुजी कोणी नसे तारिणी ॥
पूर्वीं हें जगरक्तपें पिडियलें तेव्हां तुझ्यावांचुनी ॥

कोणी संकटिं धांवला न दुसरा केले तुवां खंडित ॥
दावीं ह्या समयीं निशाचरवृकां शार्दूलविक्रीडित ॥ १८ ॥
जेव्हां दानवसंगरीं विकलता होई सुरांची तदा ॥
येशी तूं अवतार थोर जननी टाळीशि ही आपदा ॥
हाहाःकारहि संप्रति प्रगटुनी होतो जनांचा लय ॥
ह्यासाठीं जगदंबिके द्रुत करीं ह्या राक्षसांचा क्षय ॥ १९ ॥

**पद.** ( हा ऋतु ग्रीष्महीं प्रखर—ही चाल.)

कलिकालदैत्य ह्या जगतितलीं मातोनी ॥
त्रासवी सर्व ह्या सुरां ऋषींलागोनी ॥ ध्रुवपद ॥
अह्मि शिशू अससि तूं सत्य आमची जननी ॥
मग पुत्रपालनीं किंतु धरिशि कां स्वमनीं ॥
हे माये बहु राक्षसां स्वयें त्वां वधुनी ॥
अर्पिलें सौख्य गे पूर्वि बहुत ह्या भुवनीं ॥
मग धांवसि आतां कां न आमच्या अवनीं ॥
कलिकालरोग हा पीडि फार ही अवनी ॥
चाल ॥ थोर तूं अससि जगदंबे । त्रिजगतीं ॥
घे खड्ग करामधिं अंबे । भगवती ॥
हो जनांस ह्या अविलंबें । जगवती ॥
मिळवणी ॥ ह्या दैत्यभयें सुरराजऋषी त्रासोनी ॥
पावलों वनीं ह्या रक्षि भयापासोनी ॥ कलिका० ॥ २० ॥

**साकी.**

मारुनियां कलिकाल तयाचें प्राशन करिशी रक्त ॥
तेव्हां आह्मी स्वकीय कर्मीं होउं सर्व अनुरक्त ॥
त्वां हा वर द्यावा ॥ होइल सौख्य तईं देवा ॥ ध्रु० ॥ २१ ॥

### गीति.

मग उगवतील नेमें अवदानें तुष्ट हे शशी सूर्य ॥
देव द्विज ऋषि ह्यांचें जाइल कीं शेवटास सत्कार्य॥२२॥
स्वस्थानीं जाय तईं होउनियां त्रासमुक्त हर्यक्ष ॥
तसाच हा उमापति यम गुरु देवादि तो सहस्राक्ष॥२३॥
तेणें सृष्टिवरी मग नेमें वृष्टी करील मेघ तदा ॥
पृथ्वी सस्यांकुरवति वृक्ष फलित धेनु विपुल पायसदा ॥२४॥

### पद. (भला जन्म हा–ही चाल.)

ही रसभरिता वाणि ऐकुनी तुष्ट होय देवि का ॥
प्रगटली भुवनत्रयपालिका ॥ ध्रु० ॥
श्रीदेवीमुखचंद्रा पाहुनी चकोर सुर हर्षले ॥
प्रेम बहु हृदयांतरिं दाटलें ॥
साह्य कराया आह्मांस्तव हें रूप जगीं दाविलें ॥
असें हें त्यांनीं मनिं भाविलें ॥
चाल ॥ इंद्रादि देव हे नमस्कार करुनियां ॥
राहिले उभे कीं हस्तां जोडूनियां ॥
मिळवणी ॥ तुष्ट होउनी बोले तेव्हां देवां सुरनायका ॥
वचन तें सज्जन हो आयका ॥ ही रस० ॥१॥ ॥२६॥

### ओवी

तुष्ट होउनी जगन्माता ॥ अभय दे सुरवरां समस्तां ॥
ह्मणे नका करूं मनीं चिंता ॥ शत्रु आतां वधीन मी ॥२७

## भाग चवथा—वज्रेश्वरीच्या उत्पत्तीचें देवीनें सांगितलेलें भविष्य.

इंद्रादिदेवांस श्रीजगदंबेनें अभय देऊन असें सांगितलें कीं, मी तुह्मांवर प्रसन्न झाल्यें. आतां तुह्मी आपल्या स्वस्थानीं निर्भय होऊन जा; आणि आपापलीं स्वकर्में करा. ऋषींनो, तुह्मीही मनांतलें भय सोडून यज्ञयागादि सत्कर्में आचरा. तुह्मां सर्वांच्या अंतःकरणांतली इच्छा मी पूर्ण करीन.

हें देवीचें भाषण ऐकून सर्व देव ह्मणाले, मातुश्री, हा दैत्यरूप धूमकेतु उत्पन्न होऊन त्यानें आह्मां सर्वांस दीन करून स्थानभ्रष्ट केलें आहे. ह्या पृथ्वीतलावर ह्यास शिक्षा करणारा कोणीच नसल्यानें तो अत्यंत बळी झाला आहे, सर्व ऋषींना पीडा देऊन, गंधर्व, अप्सरा, दिक्पालादि त्यानें दीन केले. अग्निहोत्रादि संस्था छिन्नभिन्न करून, धर्माचा लोप करून टाकिला आहे. यज्ञपुरोडाश स्वतां भक्षण करून आपणांस त्रिभुवनाचा इंद्र तो स्वतां मानीत आहे. तर हे शिवे, ह्या कलिकालनामक शूर राक्षसाचा नाश करून आह्मां सर्वांचें संरक्षण कर, हीच तुझ्या चरणांपाशीं प्रार्थना आहे.

देवी ह्मणाली, ऋषि, देवादि विप्र हो, ह्या कलिकालदैत्याशीं तुमचें एकवीस वेळ युद्ध होणार. नंतर त्याच युद्धाचे शेवटीं महाभयंकर दोन भुजांची माझी विभूति अवतरणार. मग ह्या कलिकालराक्षसाचा व ह्याचे जे दुसरे

सैनिक त्यांच्यासह सर्वांचा नाश करणार आहें. ही पृथ्वी फार आक्रांत झाली आहे. ह्याचें दूरीकरण मी करीन. देव, ऋषी, ब्राह्मण यांस निर्भय करून सौख्य देईन. दुर्धर, लोहिताक्ष, सिंहवक्र, चंडवेग इत्यादि राक्षसांचा नाश करून ऋषिदेवगणादिकांच्या स्तुतीस पात्र होईन.

आतां तुह्मां सर्वांस एक वर देतें. तो असा कीं, तुह्मी सर्व ह्या अरण्यांत न रहातां हा मंदाग्निपर्वत व तुंगाद्रिपर्वत ह्यांवर खुशाल वास्तव्य करा. तेथें माझ्या वरप्रभावेंकरून ह्या राक्षसांची तुह्मांस बिलकूल पीडा होणार नाहीं. तुह्मी सर्व ह्या निर्भय स्थलीं गेल्यावर मग कांहीं दिवसांनीं तुंगभद्र, सिंहवक्र नांवाचे कलिकालराक्षसाचे सैनिक युद्धाकरितां येतील; ते आपलें चतुरंग दळ सिद्ध करून प्रथम कार्तिकस्वामीबरोबर, नंतर इंद्राबरोबर युद्ध होईल. राक्षस महामायावी, भयंकर वेषधारी, महाबलिष्ठ, खड्ग, धनुष्य, गदा, मुद्गल, तोमरादि शस्त्रें घेऊन युद्धाची पराकाष्ठा करून कार्तिकेयाचा पराजय केल्यावर इंद्रावर चाल करितील. मग इंद्र त्यांच्याशीं युद्धास सिद्ध होईल. इंद्राचीं सर्व आयुधें तो कलिकाल गिळून टाकील; फक्त एक वज्र मात्र इंद्राच्या हातीं शिल्लक राहील. अशा वेळीं देव, ऋषी, ब्राह्मण इत्यादि फार भयभीत होऊन जातील. कारण जो महान् दैत्य सहस्रभुजबलगर्विष्ठ; तो अनावर होईल. मग देवादि माझी स्तुति करतील कीं, हे माते, इंद्राच्या हातीं

फक्त एक वज्र आहे, इतक्यानें तरी ह्या दुष्ट राक्षसाचा पराजय होवो. हे जगदंबे, तूं महाविद्या, महामाया, चैतन्यरूपिणी अशी असून त्वां चंड, मुंड, शुंभ, निशुंभादि राक्षसांचा नाश करून पूर्वी आह्मांस सौख्य दिलें आहे. आतां ह्या कलिकालापासून आमचें रक्षण करणें तुला अशक्य नाहीं. इतकी स्तुति झाली तरी इंद्राचें व कलिकालाचें युद्ध चालूच राहील. मग इंद्रास अति त्वेष येऊन तो आपलें एकटें राहिलेलें वज्र त्या कलिकालदैत्याचे मानेवर जोरानें टाकील. तें वज्र राक्षसाच्या मानेवर पडल्याबरोबर तत्काल भिन्न होऊन त्या वज्रापासून माझी अद्वितीय विभूति वज्रेश्वरीनामक उत्पन्न होईल.

---

## भाग पांचवा—कलिकालदैत्याचें भ्रमण.

श्रीभारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, शंकरांनीं कलिकालदैत्यास वरप्रदान व सहस्र भुजा दिल्यानंतर त्यानें काय काय केलें; तें सर्व मला आपण विस्तारपूर्वक सांगावें. हें ऐकून श्रीव्यास ह्मणाले, त्या कलिकालाच्या त्रासामुळें ऋषिदेव, ब्राह्मण त्या तुंगाद्रिपर्वतावर व मंदाम्रीवर ज्या वेळीं देवीच्या वाक्याप्रमाणें निर्भय जाऊन बसले, त्या वेळीं ह्या कलिकालास यज्ञभाग वगैरे मिळेनासे झाल्यामुळें तो फार चिंताग्रस्त होऊन त्यानें देवऋषिगणांचा शोध करण्याकरितां आपले हेर सर्व दिशांकडे पाठविले. त्या हेरांनीं हूण, वंग, कलिंग, मागध, मालव, अंग, सौराष्ट्र, द्रविड, कर्नाटकादि देश धुंडाळले; पण

कोठेंच ऋषी वगैरे त्यांस आढळले नाहींत. ते वेळेस ते हेर मनांत खिन्न झाले. त्यांनीं आपल्या हिरमुसल्या तोंडांनीं हें वर्तमान कलिकालदैत्यास सांगितलें. त्या वेळीं तो प्रतापी कलिकाल मोठा क्रोधाविष्ट होऊन, डोळे अग्नीसारखे लाल करून, स्वतांच देव, ऋषि वगैरेंचा शोध करण्यास निघाला. तो अनेक देश फिरतां तुंगारण्यांत आला. त्या अरण्यांत आल्यावर त्यानें सर्व अरण्य धूम्रमय अवलोकन केलें. त्या वेळेस क्रोधाच्या आवेशासरसा धांवत धांवत तुंगाद्रिपर्वतावर चढला. त्याचा तो पर्वतप्राय देह पाहून तेथील तापसादिकांस मोठें भय वाटलें. मरुद्गण विव्हल झाले. ऋषि, मुनि आपल्या पुत्रकलत्रांसह अत्यंत भयाभीत होऊन त्यांच्या मनांत असें आलें कीं, हें मूर्तिमान् शेंडे नक्षत्रच आलें कीं काय? मग तेथून त्या दैत्याच्या भयानें निघून इंद्रादिदेव मंदाग्निपर्वतावर होते तेथें हे सर्व गेले. त्या पर्वतावर देवीच्या वरप्रभावें त्या सर्वांस भूकतहान वगैरेंची पीडा न होतां दैत्याचीही गति कुंठित झाली. ही स्थिति पाहून तो कलिकाल आपल्या अंतःकरणांत खिन्न झाला; व इतके श्रम करून कांहींच फळ झालें नाहीं असें त्यास वाटलें. अशा संतप्तावस्थेंत तो क्षुधातृषादिकांनीं पीडित होऊन त्या तुंगारण्यांत भ्रमण करूं लागला. हातांत कुऱ्हाड घेऊन त्यानें अरण्य तोडण्यास आरंभ केला. नैमिष, तुंग, दंडकादि सप्त अरण्यांचा फडशा पाडिला. असें करण्याचें कारण

हेंच कीं आपल्या फराळाकरितां गाई, ब्राह्मण, ऋषि वगैरे सांपडावे. पण त्यास इतकीं अरण्यें फस्त करतांना एकही ब्राह्मण मिळाला नाहीं. तेव्हां तो कलिकाल चिंतातुर होऊन फिरत फिरत भागीरथीच्या कांठीं आला. तेथें जे ऋषि वगैरे होते, ते पूर्वीच मंदाचलावर देवीच्या आज्ञेप्रमाणें गेले होते; ह्यामुळें त्या ठिकाणीं कलिकाल-राक्षसास कांहींच फायदा झाला नाहीं. क्षुधेनें अत्यंत त्रस्त होऊन क्षुधानिवारणाची चिंता करूं लागला. त्या अरण्यांत भयंकर वाघ, रानडुकरें, महिष, चितळे, रानगवे, मृग, वनगाई, वानरें, कस्तुरी मृग, इत्यादि पशूंचे शब्द मात्र भरपूर ऐकूं येत. हें पाहून त्या राक्षसानें आपल्या करजालानें चार कोस जागा अडवून त्यांत शतशः पशु धरिले. तें पशुरूप इंधन तो आपल्या जठरानलास अर्पूं लागला. त्या सर्व पशूंचा फराळ तो करीत असतां त्यांतच एक ब्राह्मण त्या पशूंबरोबर ह्या कलिकालाच्या उदरदरींत गेला; व तेथूनच तो ब्राह्मण राक्षसास ह्मणूं लागला कीं, अरे राक्षसा, मी गरीब ब्राह्मण असून झाडाचीं गलितपत्रें, कंद, मूलें इत्यादिकांवर निर्वाह करून राहत होतों; अशा स्थितींत त्वां मला गिळिलेंस; मी जरेनें पीडित आहें; माझी मुक्तता कर ?

कलिकालदैत्यास मोठें आश्चर्य वाटलें कीं मी ह्यास गिळिलें असून हा माझ्या उदरांतून कसा बोलतो! त्यावर त्या ब्राह्मणास कलिकाल विचारितो कीं, अरे ब्राह्मणा,

तूं जारणमारणादि कर्मे, मंत्र, तंत्र जाणतोस किंवा कसें ? ब्राह्मण ह्मणाला, अरे बाबा, मला विद्या कशाबरोबर खातात हें सुद्धां ठाऊक नाहीं. मी केवळ फक्त शिखासूत्र धारण करणारा मनुष्य आहें. शिखासूत्र हेंच ब्राह्मणाचें चिन्ह इतकें ठाऊक आहे, त्याशिवाय दुसरी विद्या मला स्वप्नांत देखील ठाऊक नाहीं. आतां तूं ह्मणतोस यावरून अशा विद्या असाव्या असें वाटतें; तरी तूं मला कृपा करून सोड, ह्मणजे मी विद्या साध्य करून ईश्वरास प्रसन्न करीन. मी तुझ्या पायां पडतों, हे महाबाहो, मला बाहेर काढ ? इतकें त्या उदरस्थ ब्राह्मणाचें दीनवचन ऐकून त्या कलिकालाच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न झालें. "आतां प्रेम उत्पन्न झालें ह्याचें कारण असें दिसतें कीं, तो ब्राह्मण राक्षसाचें खाद्य तर खराच; पण ह्या वेळीं तो पोटचा गोळा होता. तेव्हां पोटच्या गोळ्यावर प्रेम किती असतें ह्याचा अनुभव सर्व मुलांच्या आईबापांस आहे." कलिकालानें त्या ब्राह्मणाची ती दीन स्थिति पाहून मोठ्या जोरानें फूत्कार केला, त्यासरसा तो ब्राह्मण चार कोस लांब अरण्यांत जाऊन पडला, सगळें शरीर ठेंचलें, अंगावर गलत्कुष्ट व रक्तपित्त वगैरे दिसूं लागल्यामुळें त्या ब्राह्मणास फार वाईट वाटलें.

ह्याप्रमाणें हा कलिकालवर्णननामक पांचवा भाग झाला.

---

## भाग सहावा—वज्रेश्वरीक्षेत्रवर्णन.

भारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, जो गलत्कुष्ठ विप्र कलिकालदैत्यानें आपल्या फुंकाराबरोबर चार कोस दूर झोंकिला, तो कोठें गेला व त्यानें कोणत्या देवाची सेवा केली, हें सविस्तर वर्तमान मला कृपा करून सांगावें. हें भाषण ऐकून श्रीव्यासांनीं सांगितलें कीं, जो ब्राह्मण कलिकालानें फुंकून बाहेर टाकिला, तो विश्वामित्रवंशीय होता. त्याला त्या राक्षसानें फुंकून एक योजन टाकिलें; तेणेकरून सर्व अंग ठेंचून गेलें, देहाची स्मृति राहिली नाहीं. तो ब्राह्मण पंगुस्थितींत असल्यामुळें त्यास मंदाग्निपर्वतावर ऋषिदेवादिकांच्या समुदायांत जाववेना; ह्मणून तो ब्राह्मण त्या मंदाग्निपर्वताच्या दक्षिणेस उपोषित राहून श्रीरामचंद्राची उपासना करून राहिला. त्या श्रीरामनामाच्या जपानें तो ब्राह्मण क्षुधादिविकाररहित झाला. त्यानें ह्याप्रमाणें एक हजार वर्षें तपश्चर्या केली. शुद्धांतःकरणानें राहून, स्नानसंध्या, ईश्वराराधन, वैदिक कर्माचरणानें त्या ब्राह्मणानें तप केलें. तो तपःप्रभाव पाहून करुणाशाली श्रीरामचंद्र, जगन्माता जनकनंदिनी, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, आणि मारुति ह्यांसहवर्तमान प्रगट झाले. त्या वेळेस त्या ब्राह्मणानें अनन्यभावें अनेकोपचारें पूजा करून श्रीरामपंचायतनाची स्तुति केली. तो ब्राह्मण आनंदमय होऊन ह्मणाला, हे श्रीराम, करुणासागरा, देवादिकांच्या आराध्या, निर्गुणा, तुला माझा नमस्कार असो.

देव, ऋषि हे आपणांस देवत्व प्राप्त व्हावें ह्मणून रात्रंदिवस तुझी तपश्चर्या करितात. तूं साक्षात् सच्चिदानंदस्वरूप परमेश्वर आहेस. तूं निर्गुण, निराकार असून सर्व चराचरास शक्तिदाता असा परब्रह्मस्वरूप आहेस, तूं एकरूप असून जगास ब्रह्मविष्णुशिव ह्या त्रिविध रूपांनीं दृश्यमान होत आहेस. तूं साक्षात् पुराणपुरुष असून दुष्ट दानव यांचा नाश करणारा, तूं युगायुगीं धर्मग्लानि होतांच अवतार धरणारा, दीनांचें संरक्षण करणारा, आणि यज्ञयागादिकांचा प्रवर्तक आहेस. मी एक तुझा दीन सेवक आहें, मजवर तूं अनुग्रह कर. हे भक्तवत्सल, मी गलितकुष्टानें पीडलों आहें. मला ह्या रोगांत शीतोदकाचें स्नान अत्यंत ताप देतें; ह्यास्तव माझ्या रोगाची निवृत्ति होऊन ह्या जगावर उपकार होईल असें तीर्थ तुझ्या प्रसादानें उत्पन्न कर.

ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणाची दीनवाणी ऐकून तो करुणाब्धि श्रीराम संतुष्ट होऊन त्या ब्राह्मणास ह्मणाला, हे ब्राह्मणा, पूर्वसंचितानें हा भयंकर रोग तुला उत्पन्न झाला आहे. तत्राप आतां तूं काडीभर चिंता न करितां स्वस्थ रहा. मी तुला सांगतों ह्याप्रमाणें पवमानाचा प्रयोग कर. हें वाक्य ऐकतांच ब्राह्मणास अत्यानंद झाला. त्यानें श्रीरामाज्ञेप्रमाणें करितांच त्या ठिकाणीं उष्णोदकाचीं कुंडें उत्पन्न झालीं. प्रथम रामकुंड, त्याचे शेजारीं सीताकुंड, लक्ष्मणकुंड, भरतकुंड, शत्रुघ्नकुंड, मारुतिकुंड

हीं कुंडें उष्णोदकानें भरलेलीं उत्पन्न होऊन तेथेंच श्रीरामांनीं रामेश्वरनामक महादेवाची स्थापना केली. त्या रामेश्वराचें अर्चन केल्यास सकल कामना पूर्ण होतात; व ह्या उष्णोदककुंडांत स्नान केल्यापासून रोगादिकांचा नाश होऊन मनुष्य निष्पाप होतो.

ह्याच ठिकाणीं ज्ञानवापी नांवाचें तीर्थ स्नान करणारांस ज्ञान देणारें उत्पन्न केलें आहे. तसेंच ब्रह्मकुंड, विष्णुकुंड, शिव, वरुण, अग्नि, शामन, इंद्र, ईशान, सौम्य, वायु, अत्रेय, काश्यप, भारद्वाज, बिंदु, सूर्य, चंद्र, विश्वामित्र, गौतम, वशिष्ठ, परशुराम, मार्कंडेय, भृगु, गर्ग, पाराशर, वात्स्य, बाभ्रव्य, मांडव्य, कपिल, शांतेय, कर्दम, शालाक्ष, शौनक, शांडिल्य, वामन, दाल्भ्य, कौत्स्य, कौंडिण्य, नारद, मत्स्य, गोरक्ष, ह्या नांवांचीं कुंडें ह्या नदीतीरीं त्या त्या ऋषिदेवादिकांनीं निर्माण केलीं.

अशा प्रकारें हें वज्रेश्वरी अविमुक्त क्षेत्र देवादिकांच्या पापशांत्यर्थ व राक्षसांचा विनाश करणाऱ्या जगदंबेचें स्थान उत्पन्न केलें आहे. तेथें नजीकच गणेशाची स्थापना केली आहे. तो कुष्टी ब्राह्मण तुष्टि पावून सृष्टिपालकाची इष्टी करून परमेष्ठीपदाप्रत पावला. असें हें वज्रेश्वरीनामक दुर्लभ क्षेत्र जें भुक्तिमुक्ति देणारें आहे; ज्याच्या उत्तरेस भागीरथीनामक तीर्थ आहे, ज्या भागीरथीच्या दर्शनानें पापें कंपायमान होऊन पळतात; ज्या ठिकाणीं रेणुका, वज्रेश्वरी, कालिका ह्या देवीत्रयींनीं

मूर्तिमंत वास केला आहे; जेथें जमदग्निऋषींनीं वास केला; लोकांना वर देणारा परशुराम तेथें राहिला. ह्याचे पश्चिमेस तुंगाद्रिनामक पर्वत आहे, जो सर्व ऋषींनीं युक्त, ज्यावर पुष्करनामक सरोवर, ज्याचे समीप सूर्यतीर्थ, जें गलत्कुष्ट निवारण करणारें असें आहे. निर्मल नांवाचें तीर्थ अति विमलोदकानें तुडुंब भरलेलें जेथें आहे, जेथें शूलेश्वरनामक महादेव नरांना प्रत्यक्ष दर्शन देणारा वसतो. अशा प्रकारचें पावन तीर्थ व्याधि हरण करणारें ज्या वज्रेश्वरीसंनिध आहे.

ह्याप्रमाणें वज्रेश्वरीमहात्म्यांतील वज्रेश्वरीक्षेत्रवर्णननामक हा सहावा भाग संपूर्ण झाला आहे.

---

## भाग सातवा—दैत्यसेनाप्रबंध.

भारद्वाजऋषींनीं पुनः व्यासांस विचारिलें कीं, त्या द्विजास राक्षसानें तोंडांतून दूर टाकिल्यावर मग तो कलिकाल कोठें गेला; व त्यानें काय काय केलें तें मला सर्व सांगावें. व्यासऋषि ह्मणाले, त्या कलिकालानें आपले सर्व सैनिक जे उमावरप्रसादें मिळविलेले ते सर्व आपल्यासमोर बोलावून त्यांचें एकीकरण केलें. ते सैनिक येणेंप्रमाणें—दंतुर, तुंगभद्र, कुशील, कोल, दुर्धर, चंडवक्र, सिंहवक्र ह्या नांवाचे मोठे पराक्रमी व महारथी असे होते. ह्या सैनिकांनीं आपापली सेना जी देवांशीं युद्ध करणारी ती ती आपल्या ताब्यांत घेतली, व देवांशीं युद्ध करण्या-

करितां सर्व सिद्ध केली. ती युद्धविद्याविशारदसेना आपल्या शस्त्रास्त्रांसह तयार झाली. त्या राक्षसांचीं तीं भयंकर रूपें असून ते मोठे शौर्यशाली होते. असे कोट्यावधि राक्षस सज्ज होऊन त्यांनीं मोठे सिंहनाद करून तें सर्व अरण्य दणाणविलें. ह्याप्रमाणें चतुरंगसेनेनें वेष्टिलेला तो कलिकाल शंभर इंद्रांसारखा शोभूं लागला.

अशा प्रकारें सेनापति व सैन्य सिद्ध झाल्यावर त्या कलिकालानें इंद्राकडे दूत पाठविण्याचा विचार करून त्या दूतास आपल्यासमोर आणविलें. दूत आल्यावर त्यानें राक्षसेंद्रास नमस्कार केल्यानंतर तो महाबली काल त्यास ह्मणाला, तूं ह्या वेळीं मंदाग्निपर्वतावर जा, माझा शत्रु इंद्र तेथें आहे त्यास सांग कीं, तूं ह्या पर्वतावर सर्व देवांसह निर्भय होऊन माझा हविर्भाग ग्रहण करितोस हें चांगलें नाहीं. तो भाग तूं कोणत्या मुखानें खातोस हें मला लवकर सांग, जर तुझ्यांत शक्ति असेल तर युद्धास ये, तसें न होईल तर शरण येऊन माझ्या पायांवर डोकें ठेव. कारण मी स्वतः तुझा इंद्र आहें. असें असतां माझ्या समोर तूं दुसरा इंद्र कोण आहेस ? मी त्रैलोक्याचा अधिपति असून सर्व विश्व माझ्या आज्ञेंत वागत आहे.

दूतानें दानवेंद्राचा निरोप घेऊन देवेंद्रासमीप मंदाग्नि पर्वतावर तो प्राप्त झाला. त्यानें कलिकालाचा निरोप इंद्रास यथातथ्य सांगितला. त्या दूतानें तो मंदाग्निपर्वत पा

हिला तों त्यावर देवांचीं, ऋषींचीं, ब्राह्मणांचीं वेदोक्त-कर्में निर्भय चाललीं आहेत. सर्वांस इंद्रानें निरोप कळविल्यावर देवांची सभा झाली. नंतर इंद्रानें त्या दूतास मोठ्या गंभीरपणानें प्रत्युत्तर दिलें कीं, अरे दूता! तूं त्या मदोन्मत्त कलिकालास असें सांगः–एक इंद्र, एक चंद्र, एक सूर्य, एक शंकर असे एक एक असतां इंद्रामध्यें तूं रे वांटेकरी कोण? सर्व यक्षराक्षस, पन्नग, दैत्य, दानव, हे सर्व माझ्या चरणाचे दास आहेत. असें असतां हा कलिकालराक्षस मला कांहीं अनावर योद्धा नाहीं. युद्धास सिद्ध हो. हे दूता, आलास त्या स्थळीं परत जा व त्यास माझा निरोप कळीव.

अशा प्रकारचा इंद्राचा निरोप पुनः कलिकालास त्या दूतानें कळविला. तो निरोप ऐकून कलिकालास हर्ष झाला व त्यानें युद्धाची नौबद वाजविली. सर्व राक्षससैन्य सिद्ध केलें. त्या राक्षसांचीं शरीरें कोणी सप्ततान उंच, कोणी पर्वतासारखा, कोणी योजनभर लांब, कोणी सात तोंडांचा, कोणी महाभुज, कोणी दहा भुजांचा, कोणी चार मुखांचा, कोणी सिंहमुख, कोणी ऊर्ध्वकेशी, कोणी महान्केशी, कोणी अतिबलाढ्य! कोणी मुद्गर धारण केलेला, असें सर्व सैन्य सिद्ध झालें. त्या राक्षसांनीं आपल्या आरोळ्यांनीं तें सर्व अरण्य दणाणविलें. तें राक्षसांचें सैन्य नव्हतें; तर चालणारे पर्वतच होते कीं काय असें वाटे! असें तें सर्व सैन्य व्यवस्थेनें उभें करून त्यावर जे जे सै-

निक ज्या ज्या स्थानीं उभे राहण्यास योग्य त्या त्या स्थानीं उभे करून युद्धास तयार झाले.

इकडे इंद्रानें आपल्या सैन्यावर स्वामिकार्तिक यांची सेनापतीच्या जागीं योजना करून सर्व अस्त्रें शस्त्रें यांसह सैन्य सिद्ध केलें. त्या इंद्रसैन्यांत सर्व देव, अग्नि; वायु, मेघ इत्यादि अस्त्रांच्या साक्षात् देवताच उभ्या होत्या! मग अस्त्रांची वेगळी गरज तीं कोणास नव्हती. ह्याप्रमाणें त्या दैत्यांचें व ह्या देवांचें अशीं दोन्ही सैन्यें युद्धास समोरासमोर येऊन भिडलीं.

---

## भाग आठवा—दंतुरनामक राक्षसाचा वध.

भारद्वाजांनीं व्यासांस विचारलें—कलिकालराक्षसाच्या सैन्याची सर्व तयारी झाल्यावर इंद्राचें व कलिकालाचें पुढें कसें कसें झालें तें आपण सांगावें. व्यास ह्मणाले, त्या कलिकालराक्षसानें, प्रथम आपला एक वीर दंतुरनामक होता त्याजबरोबर हत्ती, घोडे, रथ, पायदळ असें सैन्य देऊन इंद्राशीं युद्ध करण्यास पाठविलें. तो महान् भयंकर दंतुरराक्षस युद्धाचे तयारीनें सिद्ध झाला. त्याचे वीर कोणी भाले, कोणी तरवारी, कोणी धनुष्यबाण, कोणी दगड, कोणी मुद्गल, कोणी गोफणी, कोणी तोमरें, अशीं शस्त्रें घेऊन युद्धभूमीचे ठायीं तयार झाले. हा दंतुर ज्या वेळेस युद्धास पाठविला; त्या वेळेस कलिकालानें त्यास सांगितलें कीं, जर देवांचा पराजय करशील तर मला तोंड

दाखीव, नाहींपेक्षां तिकडेच मर. हें वाक्य ऐकून खिन्नचित्त झालेला दंतुर युद्धास आला. राक्षसांची तयारी पाहून इकडे देवसेनापति कार्तिकस्वामी युद्धास सिद्ध झाले. तेही महापराक्रमी व मोठे युद्धकुशल होते. सर्व राक्षसकानन दग्ध करण्यास प्रत्यक्ष अग्नीसारखे असून त्यांनीं आपलें धनुष्य सज्ज करून वीरासन घालून धनुष्यास बाण लाविला. एक बाण त्या दंतुरराक्षसावर मोठ्या वेगानें सोडल्यावर तो दंतुर क्षणभर मूर्च्छित झाला. पुनः दैत्यांनीं एकवटून त्या दंतुरास सावध केल्यावर दंतुरानें एक बाण कार्तिकस्वामींवर सोडिला. नंतर कार्तिकस्वामींनीं अर्धचंद्रबाण त्या दंतुरावर सोडतांक्षणीं तापल्या अग्नीप्रमाणें राक्षस क्षुब्ध झाला. तो व्याकुल होऊन मोठ्या स्वरानें ह्मणाला कीं, दैत्यांची विजयश्री गेली ह्यांत संशय नाहीं. इतकें बोलून दंतुरराक्षसानें देवसैन्यावर सर्पास्त्र सोडिलें. तें सोडतांक्षणींच सर्व देवसैन्यांत साप प्रगटले. ते अक्राळविक्राळ विषधर सर्व सैन्यांत पसरतांच देवांचे सैनिक फारच घाबरून गेले. अशा प्रकारें आपल्या सैन्यांत सर्व सर्प पसरलेले कार्तिकेयांनीं पाहिले. त्या वेळीं स्कंदांनीं गरुडास्त्राची योजना केली. तें महान् दारुण गरुडास्त्र सुटतांच ते सर्व सर्प नाश पावले. हें पहातांच तो देवद्वेषी राक्षस दंतुर फारच चवताळून आपल्या सैनिकांशीं बोलूं लागला. सैनिक हो, हे देव फारच शेफारले, ह्यांना एका क्षणांत नाहींसे करून टाकितों पहा ! तुह्मी

घाबरूं नका. ह्याप्रमाणें आश्वासन देऊन तो दंतुर व इतर सैनिक यांनीं आपल्या हातांत कोणी मुद्गल, कोणी ताडवृक्ष, कोणी पाषाण, कोणी इतर वृक्ष असे हजारों ग्रहण करून त्या देवसैन्यावर केवळ दगड, वृक्ष ह्यांचा पर्जन्य पाडिला. ह्याप्रमाणें होतांच देवांच्या सैन्यानें थोडा माघार घेतला. सर्व हाहाःकार करूं लागले. ह्या प्रकारची देवांच्या सैन्याची स्थिति पहातांच सर्व ऋषींनीं त्या सैन्यास आश्वासन देऊन इंद्रानें कार्तिकस्वामींच्या साह्यास आणखी दिक्पाळ पाठविले. ते मोठे धुरंधर योद्धे होते. त्यांनीं दैत्यांचा थोडा वरचढपणा पहातांच मनांत फारच संतापले. हे सर्व दिक्पाल व देवसैन्य एकत्र होतांच कार्तिकस्वामींनीं पुनः दैत्यांशीं युद्ध आरंभिलें. प्रथम महान् शर घेऊन तो समंत्रित करून धनुष्यापासून सोडिला, तेणेंकरून त्या दंतुराचें धनुष्य छेदन केलें. चार बाण सोडून त्याच्या रथाचे घोडे मारिले. तेणेंकरून तो दंतुर विरथ होऊन भग्नचाप झालेला युद्ध करूं लागला. अशा स्थितींत जरी तो होता तरी त्यानें एक मोठा भयंकर मुद्गर उचलून तो स्वामिकार्तिकेयांवर धांवला. पण त्या चपळ महावीर कार्तिकस्वामींनीं शरवर्षाव करून त्याच्या मुद्गराचें चूर्ण करून टाकिलें. हें पाहून सगळे राक्षस मोठे संतापले. परंतु देवांनीं नाना शस्त्रें धारण करून ते सगळे राक्षस हतवीर्य केले. पुष्कळ सैन्य खपविलें. ह्याप्रमाणें त्या कार्तिकस्वामींच्या हस्तलाघवानें राक्षसास मृत्युनगरची वाट धरावी लागली. तो

पादचारी दंतुरराक्षस स्वामींनीं नष्ट केला. त्या वेळीं सर्व देवता आनंदित झाल्या; गंधर्व गायन करूं लागले; ऋषि, साधक, महान् तापसी हे हर्षित होऊन श्रीदेवीची स्तुति करूं लागले.

---

## भाग नववा—तुंगभद्रराक्षसाचा वध.

भारद्वाजऋषि व्यासास ह्मणाले, दंतुरराक्षसाचा पराजय झाल्याचें वर्तमान ऐकून पुढें त्या कलिकालानें काय केलें, व पुढें युद्धास कोण पाठविला तें मला कृपा करून सर्व आपण सांगा. हें भारद्वाजांचें वाक्य ऐकून व्यास ह्मणाले, तो महारथी दंतुर पराजित होऊन मृत्यु पावला, हें वर्तमान ऐकून कलिकाल फारच खिन्नचित्त झाला; व त्यासरसा मोठा क्रोधाविष्ट होऊन पुष्कळ सैन्य बरोबर देऊन त्यानें त्याचा दुसरा सैनिक तुंगभद्र नांवाचा देवांशीं युद्ध करण्यास पाठविला. तो तुंगभद्र-राक्षस मोठा बलिष्ठ होता, तशांत बरोबर सैन्यही मोठें होतें. अशा सैन्यासह कार्तिकस्वामींस जिकण्याच्या इच्छेनें तो युद्धभूमीचे जागीं प्राप्त झाला. तो आंगा-मध्यें कवच चढवून सर्व सैन्यासह रणभूमीवर येतांच देवसैन्य थरथरां कांपूं लागलें. आपसांत एकमेकांशीं देवांकडील लोक बोलूं लागले कीं, हें केवढें मोठें सैन्य आहे!! परंतु स्वामी कार्तिक मोठे धुरंधर योद्धे, ते तिळ-मात्र न घाबरतां त्यांनीं रणभेरीचा नाद करविला व युद्ध

करण्यास सिद्ध झाले. अशी स्वामींची युद्ध करण्याची उत्सुकता पाहून तो तुंगभद्रराक्षस मनांत संतापून मोठ्या गंभीर स्वरानें कार्तिकस्वामींशीं शरयुद्धाच्या अगोदर वाग्युद्ध करूं लागला.

तुंगभद्र ह्मणाला, अरे, माझा भाऊ दंतुर यास तुह्मीं दुष्टांनीं छल करून मारिला. अरे, तूं गरीब बापडा, हीन, दीन, तुला सेनापति कोणीं केलें? हे षंढ मरुद्गणांनो? अरे, तुह्मीं अझून रणपंडित भट पाहिला नाहीं. तुमचें देवांचें वीरत्व, युद्धकौशल्य, तुमचें सैन्य, ह्यांची महती कोठपर्यंत? जोंपर्यंत माझी भोंवई क्रोधाविष्ट होऊन नाचूं लागली नाहीं तोंपर्यंत. तुह्मां देवांच्या अंगांत जर कांहीं शूरपणाचें पाणी असेल तर मला दाखवा. नाहीं तर माझें हस्तकौशल्यकौतुक पहा. इतकें बोलून धनुष्याची प्रत्यंचा चढवून बाण लाविला, तेणेंकरून कार्तिकस्वामींस त्या बाणघातानें मूर्च्छा आली. ही मुख्य सेनापतीची अवस्था पाहून देवसैन्य दशदिशा पळूं लागलें, सर्व सैन्य थरथर कांपूं लागलें. ज्याप्रमाणें वायूच्या योगानें केळीचीं पानें कंपायमान होतात तसें हें देवसैन्य त्या तुंगभद्रराक्षसाच्या भयानें कंपायमान झालें. अशा भयंकर स्थितींत आपलें सैन्य पडलेलें पहातांच ते सेनापति कार्तिकेय आपली मूर्च्छा सांवरून, सावध होऊन त्यांनीं आपलें धनुष्य सज्ज केलें; व एक अर्धचंद्रबाण अशा जोरानें मारिला कीं, प्रथमच त्या तुंगभद्राच्या

रथाचा ध्वज कमलाच्या तंतूप्रमाणें छेदून टाकिला; व असा कांहीं अपूर्व पराक्रम दाखविला कीं, जो वर्णितां येत नाहीं. त्या तुंगभद्राचे कितीक रथ भग्न केले. शंभर धनुष्यें एकामागून एक अशीं कार्तिकस्वामींनीं भग्न केलीं. हा स्वामींचा पराक्रम पाहून देवांचें सैन्य पुनः स्वामी-भोंवतीं साह्यार्थ जमा झालें. स्वामींनीं ह्या तुंगभद्रयो-ध्याबरोबर तुमुल युद्ध केलें. त्याचे घोडे चार बा-णांनीं मारिले. जेव्हां तो तुंगभद्र विरथ झाला, तेव्हां एका मोठ्या घोड्यावर बसून तो कार्तिकस्वामींशीं लढूं लागला. सर्व देवसैन्यानें श्रीदेवीची स्तुति करून हातांत धनुष्य, बाण, भाले, बरच्या, चक्रें, फरशा, इ-त्याद्यनेक शस्त्रें घेऊन दैत्यसेनेचा नाश करूं लागले. हें देवसेनेचें कृत्य पाहून तो प्रतापी तुंगभद्र हातांत गदा घेऊन देवसैन्यावर आला. त्यासरसें सर्व दैत्यसैन्य ए-कदम देवसैन्यावर चाल करून आलें. कोणी देवसैन्यावर बाण टाकूं लागले; कोणी बरच्या, भाले, मुद्गल, ताड-वृक्ष, पर्वतांचे कडे, झाडें, इत्यादि वर्षाव करून पुनः देव-सैन्य भयाभीत केलें. असे ते तुंगभद्र व स्वामीकार्तिक ह्यांचें महान् भयंकर युद्ध चाललें. अशा भयंकर युद्धांत स्वामीकार्तिकेयांनीं न गडबडतां त्या प्रतापवान् राक्षसावर इंद्रानें दिलेली शक्ती, जी त्रिभुवनांत विख्यात, ती मंत्रून सोडिली. ती अघटित शक्ती मोठ्या वेगानें जाऊन त्या तुंगभद्रराक्षसाच्या डोक्यावर अदळली ! त्यासरसा मोठ्या

पर्वताचा कडा ढांसळतो ह्याप्रमाणें तो तुंगभद्रराक्षस गत-
प्राण होऊन भूमीवर अचेतन पडला. अशी राक्षसाची
मृतावस्था पाहून त्याचें सैन्य हाहाकार करून दाही दि-
शांकडे पळूं लागलें. कोणी तर जागच्या जागींच मृत
झाले. कोणी अर्ध मेले, कोणी मूर्च्छित, कोणी कंपित
असे ते राक्षस भयभीत झाले.

ऋषींना अत्यानंद झाला. यक्ष, गंधर्व, किन्नर इत्या-
दिकांनीं तुंगभद्राच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून पुष्पवृष्टि
केली. इंद्रास सेनापतिविजयाची सुवार्ता कळून मोठा
हर्ष झाला.

कलिकालराक्षसास दूतांनीं हें वर्तमान कळवितांच
तो अंतःकरणांत खिन्न होऊन क्षणभर मुक्यासारखा त-
टस्थ झाला. नंतर अत्यंत क्रोधाविष्ट होऊन डोळे
गृध्रासारखे करून त्यानें कुशील नांवाचा तिसरा योद्धा
पाचारिला. तो कुशील परम दारुण वीर होता. तो
समोर येऊन त्यानें कलिकालास वंदन केलें; व समोर
बसला. तेव्हां राक्षसेंद्र त्या कुशीलास ह्मणाला, हे कु-
शीला, तूं आतांचे आतां आपलें सैन्य घेऊन इंद्रास बां-
धून एथें आण ? अथवा त्याला मारून टाक ? सर्व देव
मार; हें कार्य तूं करशील काय ? देवपत्न्या माझ्या
दासी होतील काय ? इतकें बोलणें ऐकून त्या कुशील
राक्षसानें कलिकालास नमन केलें.

## भाग दहावा—कुशीलराक्षसाचा वध.

भारद्वाज ऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, त्या युद्धांत तुंगभद्रराक्षसाचा वध कार्तिकस्वामींनीं केल्यावर कुशीलराक्षस युद्धाकरितां समरांगणांत आला; त्याचें वर्तमान सर्व सांगावें. व्यास ह्मणालेः—त्या कलिकालानें तो कुशील सशस्त्र, ससैन्य देवसेनेच्या पराजयाकरितां पाठविला. तो कुशील पेटलेल्या अग्निज्वालेसारख्या लालभडक डोळयांचा, युद्धविद्यानिपुण, त्या रणांगणांत येऊन उभा राहिला. सर्व देवांस युद्धाकरितां त्या राक्षसानें पाचारण केलें. इकडे तो प्रतापी इंद्र ऐरावतावर बसून सर्व शस्त्रास्त्रांनिशीं सिद्ध झाला. इंद्राचें सैन्य असें होतें:—तीनकोटी वायुवेगासारखे रथ, सहा कोटी हत्ती, नऊ कोटी घोडे, अठरा कोटी पायदळ; ह्यांत हत्ती महा मदोन्मत्त, रथांवर रथी तसेच योद्धे, घोडे अत्यंत वेगवान्, पायदळ तसेंच युद्धकुशल; अशा सैन्यासह तो सुरपति इंद्र चतुरंग सेना सज्ज करून युद्धास आला. गंधर्व गायन करूं लागले. अप्सरा नृत्य करूं लागल्या. दोन्हीकडचे वीर महान् भयंकर सिंहनाद करूं लागले. देवदैत्यांचीं दोन्ही सैन्यें युद्धास तयार झालीं. कुशील वीर आलेला पाहून इंद्रानें आपले सेनापति यांस सैन्याची रचना करण्यास सांगितलें. सेनापति कार्तिक यांनीं वरुणासह रणांत ठाण दिलें. आपलीं सुवर्णकोटीचीं धनुष्यें सज्ज केलीं. प्रथमतः त्या दैत्याचा ध्वज देवांनीं

अद्भुत कर्म करून छेदिला. हें पाहून त्या कुशील-राक्षसास अत्यंत क्रोध येऊन त्याचें सर्व सैन्यही फारच क्रोधाविष्ट झालें. मुद्गरबाण हजारों सुटूं लागले. देवांचा घात करण्याकरितां शेंकडो शक्ति, हजारों पट्टे, शत्रूवर सोडूं लागले. कोणी पाशांनीं आपापले शत्रू बद्ध करूं लागले. कोणी हत्तींचे अंकुश हातीं धरून त्यांनीं देवांस ओढूं लागले. कोणी मोठमोठे दंड घेऊन चंड पराक्रमानें देवांस खंडविखंड करूं लागले. कोणी तरवारीनें शत्रू ताडूं लागले. कोणाच्या शरीरांतून रक्ताचे पूर वाहूं लागले. कोणाच्या कटि भग्न झाल्या. कोणाच्या छातीस भोकें पडलीं. कोणाचीं शरीरें द्विभाग झालीं. कोणाचे हात तुटले. कोणाचीं मस्तकें तुटलीं. ह्याप्रमाणें त्या देवसैन्यावर कुशीलराक्षसानें मोठा जुलूम केला. देवांचें सैन्य आठ कोस हटविलें. देवांनीं हाहाकार करून संकटकाळीं श्रीदेवीचें स्तवन केलें तें:—हे जननी, ह्या दुःखांत तुजवांचून दुसरें कोण आह्मांस तारणार आहे ? ह्याप्रमाणें देवांनीं हातपाय गाळलेले पाहून इंद्र अति संतापून सर्व देवांची निर्भत्सना करूं लागला. तो ह्मणाला, अरे, तुह्मी देव असून ह्या असुरांस भिऊन पळतां काय ? इंद्राचें भाषण ऐकून देवांच्या सैन्यानें उलटून आतां राक्षसांचा नाश करूं अशा प्रतिज्ञेनें दानवसैन्यावर शस्त्रास्त्रांचा भडिमार केला. भाले, तरवारी, चक्रें, बाण, गोफणी, गदा, तोमरें, मुसळे, ह्या शस्त्रांच्या मारांनीं

राक्षस बेजार केले. तरवारीनें कोणाचे हात, पाय, कान, नाक, कंबर इत्यादि अवयव तोडिले. कोणाचे अश्व मारिले; कोणीं हत्तींचे शुंडादंड तोडिले. कोणाचे रथ मोडून फस्त केले. ह्या प्रकारचें तुमुल रणकंदन अवलोकन करून कुशीलराक्षस फार संतापला. तो आपल्या सैन्यास ह्मणाला, अरे महादैत्यांनो, तुह्मी मोठे योद्धे ह्मणून कलिकालानें मला तुमचा सेनापति करून ह्या देवांवर पाठविलें; असें असतां तुह्मी आपलें भयंकर स्वरूप टाकून पळतां हें काय? तुह्मां सगळयांना ह्या देवांनीं जर्जर करावें ह्या गोष्टीची तुमच्या मनांत लाज वाटत नाहीं काय? अरे, हे देव ह्मणजे आपलें भक्ष्य! ह्या भक्ष्यानें भक्षकांवर प्रहार करणें हें किती शरमेचें काम आहे? आतां तुह्मी पुनः देवांवर चाल करा व माझा पराक्रम पहा?

ह्याप्रमाणें त्या कुशीलराक्षसानें भाषण करून आपलें धनुष्य हातांत घेऊन त्यास अति तीक्ष्ण बाण लाविला. तो बाण देवसैन्याचा मुख्य जो कुबेर त्या कुबेरावर सोडिला. त्या बाणाच्या योगानें एक पलभर कुबेरास मूर्च्छा आली. ती मूर्च्छा सांवरून कुबेर सावध झाल्यावर पुनः राक्षसासीं युद्धाकरितां तयार झाला. त्या राक्षसाचा पराक्रम पाहून कुबेर अति संतापून त्यानें आपल्या धनुष्यास बाण लावून तो आकर्ण ओढून कुशीलराक्षसावर सोडिला. हा बाण नव्हता तर साक्षात् यमाचा पाशरूप होता. त्या बाणानें कुशीलराक्षसाचा कंठनाल

एकदम उडविला व वरुणानें आपला शत्रु जो कुशील तो गतप्राण केला. त्याचें मस्तक छेदिल्याबरोबर तो महाबळी कुशील प्राणास मुकून त्याचें तें धड युद्धभूमीवर धाडदिशीं आपटलें. कुशील मरण पावला हें ऐकून सर्व देव, ऋषि, तपोधन, सर्व लोक, दिक्पालादिकांस अत्यानंद झाला.

कुशीलराक्षस मेल्याचें वृत्त ऐकून कलिकालराक्षस फारच खिन्न झाला. नंतर त्या बुद्धिमान् कलिकालराक्षसानें देवांशीं युद्ध करण्यास कोलासुरनामक प्रचंड वीर बोलाविला. स्वामिआज्ञेप्रमाणें तो कोलासुरदैत्य देवांशीं युद्ध करण्याची स्वामीची इच्छा तृप्त करण्यास कलिकालाच्या समोर प्राप्त झाला. असा हा कुशीलदैत्य वरुणाच्या हस्तें मरण पावला, हा ह्या भागांतील सारांश आहे.

---

## भाग अकरावा—कोलासुरसेनासज्जीकरण, व त्याचा वध.

भारद्वाजांनीं व्यासांस विचारिलें कीं, वरुणानें पाशबद्ध करून त्या कुशीलदैत्यास मारिल्यानंतर पुढें काय झालें तें सांगावें. तेव्हां व्यास ह्मणाले, तो कुशील मेल्यानंतर कलिकालानें कोलासुर नांवाचा मोठा योद्धा देवांवर पाठविला. तो कलिकालाच्या समोर येतांच त्यास

त्यानें मोठें सैन्य दिलें. साठ हजार रथ, मत्त झालेले हत्ती साठ हजार, दोन लक्ष घोडे, अमित पायदळ असें अमित सैन्य घेऊन तो कोलासुर ज्या वेळीं रणांत येण्यास निघाला, त्या वेळीं त्या वीरांचे सिंहनाद, घोड्यांचें खिंखाळणें, भेरींचे दणदण आवाज, ह्यांनीं सर्व दशदिशा व आकाश गर्जवून सोडिलें! सूर्य निस्तेज झाला! आकाश धुळीनें व्यापिलें! सर्व पृथ्वी कंपायमान झाली! पर्वतही दोल्यांसारखे डोलूं लागले! ऋषिगण त्रस्त झाले! ऋषिपत्न्या भयकंपित झाल्या! ह्याप्रमाणें तें टोळधाडीसारखें सैन्य देवांबरोबर युद्ध करण्यास निघालें. हें इंद्रानें पाहून त्या कोलासुर-राक्षसास मारण्यास समर्थ असा जो जयंत नांवाचा प्रिय पुत्र त्यास पाचारण करून इंद्र त्यास ह्मणाला, पुत्रा, आज आपणाशीं युद्ध करण्यास कोलासुर नामक योद्धा तयार होऊन आला आहे. ह्या दुष्ट राक्षसांनीं देव, ऋषि, तपोधन वगैरे सात्विकांस अत्यंत पीडा दिली आहे. यज्ञ विध्वंसिले, आपणां सर्वांचे हविर्भाग ह्यांनीं नेले, अग्निहोत्रें छिन्न केलीं, पुण्यक्षेत्रें दूषविलीं; ह्याप्रमाणें शेंकडों प्रकारें आपणां सर्वांस त्रास दिला. ह्या राक्षसांचा मुख्य नायक कलिकाल अत्यंत दुष्ट आहे. त्याचाच हा आलेला राक्षस मोठा आवडता मित्र आहे. ह्या राक्षसाशीं युद्ध करण्यास तूं जाऊन ह्याचा नाश कर. ह्यांनीं जे मोठमोठे हत्ती आणिले आहेत, ते दिग्गज असून त्यानें बलात्कारानें नेऊन हल्लीं आपणांबरोबर लढण्यास ते

आणून आपणांस हे दुष्ट राक्षस लाजवीत आहेत. आतां तूं ह्या दुष्ट राक्षसांबरोबर युद्धास जा. हें पित्याचें भाषण ऐकून जयंतानें उठून पित्यास वंदन केलें, व आपणाबरोबर सैन्य घेतलें. तें दोन कोटी रथ, तीन कोटी हत्ती, पांच कोटी घोडे—हें सैन्य भेद करणारें—दहा कोटी घोडेस्वार, मोठे योद्धे, सर्व वीर युद्धकुशल असें हें सैन्य घेतल्यावर जयंत पित्याची आज्ञा मागूं लागला. तेव्हां इंद्रानें पुनः पुत्रास उपदेश केला कीं, हे शूर पुत्रा, तूं हें चतुरंगदळ घेऊन शत्रूस आपला पराक्रम दाखवून ये. हें ऐकून पुनः जयंतानें पित्यास वंदन करून त्या सर्व सेनेचें सेनापतित्व स्वीकारून युद्धभूमीच्या ठायीं तो जयंत आपल्या सेनेसह आला.

जयंतानें कोलासुराकडे आपला दूत पाठवून त्यास आपण युद्धास आल्याचें वृत्त कळविण्यास सांगितलें. कोलासुराचा दूतही त्याचप्रमाणें जयंताकडे आला. जयंताकडील दूतानें कोलासुरास सैन्याची स्थिति, युद्धास आलेला जयंतवीर वगैरे सांगितल्यावर तो मदोन्मत्त कोलासुर मोठी गर्जना करून ह्मणाला, अरे, मी प्रतापी वीर असून माझ्यासमोर हें मूल युद्धाकरितां येत आहे! ह्या मुलानें कोणाशीं युद्ध केलें? निजलेल्या सिंहास पाय लावून जी स्थिति त्या पादस्पर्श करणाराची होते, तीच स्थिति ह्याची होईल. हें मूर्ख पोर कापसासारखें असून मी मेरूसारखा हें न जाणून मजशीं तुलना करण्यास प-

हात आहे काय ? किंवा ह्याचें आयुष्य सरलें ह्मणून हें महाभुजंगाचा मुका घेण्यास धांवत आलें आहे ! असो. आतां ह्यास मी कौतुक दाखवितों. ह्याप्रमाणें दूताशीं भाषण केल्यावर त्या दूतानें हें सर्व वर्तमान जयंतास कळविलें. जयंतानें हें ऐकून राक्षसाच्या मूर्खत्वाचें दिग्दर्शन समजून समाधान मानिलें. व आपलें सैन्य सिद्ध करून युद्धाकरितां तो सिद्ध झाला.

पुनः भारद्वाजऋषींनीं व्यासांस प्रश्न केला कीं, त्या कोलासुराशीं जयंताचें युद्ध कोणत्या प्रकारानें झालें तें मला सांगावें. व्यास ह्मणाले, तो युद्धविद्यानिपुण कोलासुर सैन्यानिशीं जयंतावर चालून आला. तेव्हां नौबदी, रणभेरी, युद्ध करणारांस स्फुरण आणणारीं वाद्यें, ह्यांचा एकच घोष झाला. हत्तीशीं हत्ती, घोडेस्वाराशीं घोडेस्वार, रथ्याबरोबर रथी, पायदळाबरोबर पायदळ असे एकवटून मोठें तुंबळ युद्ध झालें. शेंकडों, हजारों वीर महावेगानें इकडून तिकडे व तिकडून इकडे धांवूं लागले. जयंताकडील वीर कोणी भाले, कोणी गदा, कोणी तरवारी, कोणी तोमरें, कोणी मुसळें, कोणी गोफणी, कोणी शक्ति, कोणी पट्टिश इत्यादि शस्त्रें घेऊन राक्षसांबरोबर युद्ध करूं लागले. हजारों राक्षसांचीं मस्तकें तुटून पडलीं. ह्याप्रमाणें हें मोठें तुमुल व भयंकर युद्ध झालें. एकमेकांचीं तोंडें एकमेकांस दिसेनाशीं झालीं. कोणाचीं धनुष्यें मोडलीं. कोणाच्या घोड्यांचे लगाम

तुटून घोडे सैरावैरा पळूं लागले. कोणी भाल्यांनीं टोंचल्यामुळें विव्हळ होऊन पडले. कोणी रथांच्या चाकांखालीं चेंगरले. कोणी मुसळांच्या दणक्यानें घायाळ होऊन पडले. कांहीं हत्ती भग्नदंत होऊन पळूं लागले. कोणी राक्षस गोफणगुंड्यांच्या सपाट्यासरसे पडले. कोणाच्या शरीरांतून रक्त वाहूं लागलें. कोणाचें अर्धेंच शरीर तुटून गेलें. ह्याप्रकारें देवसैन्यानें राक्षससैन्याची धूळधाण केली.

दैत्यसेनेच्या आक्रोशानें सर्व युद्धभूमि नादित झाली. ज्या राक्षसास जी वाट दिसेल त्या वाटेनें ते भयभीत होऊन पळूं लागले. पुष्कळ सैन्य तर खपलेंच, परंतु जें राहिलें त्यांतील वीर फुललेल्या पळसाच्या झाडासारखे रक्तमय दिसूं लागले. ही सैन्याची दीनावस्था पाहून कोलासुरराक्षस मोठ्यानें ओरडला. त्यानें आपल्या वीरांस धिक्कारून ह्मटलें, अरे, तुह्मी वीर असून पळतां, ह्याची लाज वाटत नाहीं काय? हें आपल्या सेनापतीचें भाषण ऐकून ते महाबलवान् दैत्य एकदम उलटले. त्यांत कोणी पंचतालासम उंच, कोणी दीर्घदंत, कोणी रक्तनेत्र, कोणी महाक्रोधी, कोणी मोठे वेगवान्, कोणी ऊर्ध्वकेशी, कोणी मोठमोठे मुद्गल हातीं घेतलेले, कोणी तालवृक्ष हातांत घेऊन, कोणी मोठमोठे पाषाण घेऊन देवसैन्यावर धांवले. कोणी ढालीतरवारी, कोणी तोमरें, कोणी मुसळें घेऊन युद्ध करूं लागले. कोणी महाभयंकर, कोणाचें पोट जसा मोठा तलाव, कोणी सिंहासा-

रण्या तोंडाचे, कोणी नानारूपें धरणारे असे लक्षावधि राक्षस देवांबरोबर युद्ध करूं लागले. तोमरें, कुऱ्हाडी, मुद्गल, अंकुश इत्यादि शस्त्रांनिशीं देवांवर राक्षस चालून आले. त्या वेळीं सर्व पृथ्वींत अंधकार पडला; इतका धुरळा त्या युद्धामध्यें झाला. त्या राक्षसांनीं एकच गर्दी केली. पण जयंतवीर महान् पराक्रमी ! त्यानें अगदीं न गडबडतां आपला रथ ह्या राक्षसांच्या मध्यभागीं आणून उभा केला; व असें भयंकर कर्म केलें कीं ज्यानें सर्व देवांस हर्ष दिला. दैत्यांस आधीं थोडी भाषणांची मात्रा देऊन मागाहून मृत्युलोकाची यात्रा दाखविली. जयंत त्या कोलासुरास ह्मणाला, अरे, तूं माझा पराक्रम न जाणून युद्धाचे अगोदर वाटेल तशी वल्गना केलीस. आतां तुला पराक्रम दाखवितों तो पहा. असें बोलून अर्ध-चंद्र बाण धनुष्याशीं लावून त्या कोलासुरावर सोडिला. त्या बाणानें त्या राक्षसास मूर्च्छा आली. पुनः दुसऱ्यानें आपल्या धनुष्यास बाण लावून तें आकर्ण ओढून अशा जोरानें कोलासुरावर बाण सोडिला कीं, त्या बाणासरसें त्या राक्षसाचें हृदय विदारण होऊन तो जमिनीवर मरून पडला. त्या वेळीं त्याच्या सैन्यांत हाहाःकार होऊन उर-लेलें सैन्य पळूं लागलें. देवांचा जय झाल्याचें पाहून ऋषि, मुनि आनंदित झाले. आकाशांतून जयंतवीरावर व देव-सैन्यावर पुष्पवृष्टि झाली. गंधर्व गायन करूं लागले. ह्या-प्रमाणें सर्व आनंदीआनंद झाला.

## भाग बारावा—कलिकालराक्षसाचें वर्णन आणि वज्रेश्वरीप्रादुर्भाव.

भारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, कोलासुरराक्षसास जयंतानें मारिल्यानंतर पुढें युद्धाचें कसें वर्तमान झालें तें कृपा करून मला सांगा. हें भारद्वाजऋषींचें भाषण ऐकून त्यांस व्यास ह्मणाले, त्या महाबलवान् कलिकालास कोलासुर मरण पावल्याचें वर्तमान ऐकून फार वाईट वाटलें. जलावांचून जसा मासा तडफडतो, त्याप्रमाणें तो कलिकाल तडफडूं लागला. कोणांशीं भाषण न करितां जागचे जागीं तटस्थ झाला. आणि आपल्या मनांत ह्मणूं लागला कीं, काय, माझ्या तपश्चर्येचें हेंच फळ ! शंकरानें कांहींच केलें नाहीं ! अशी चिंता करून शुद्ध मनानें त्या कलिकालराक्षसानें श्रीशंकराचें चिंतन केलें. तें असें—जय जय उमापति शंभो, महारुद्रा, चंद्रशेखरा, त्वां दिलेला वर कांहींच फलद्रूप झाला नाहीं. हे देव तर जो जो वीर मी पाठवितों त्याचा नाश करीत आहेत, हा माझ्या मनाचा पूर्ण निश्चय झाला आहे. आतां मी तुझ्या चरणाचा सेवक वर मागतों तो कृपा करून मला दे. मला सहस्रभुजा शस्त्रसहित देऊन देवांच्या शस्त्रांनीं माझ्या देहास किंचित् इजा होऊं नये हें देणें दे. देवांचीं आयुधें मी गिळून टाकीन असें मला शक्तिमान् कर. शेंकडोंशें देवांचा मीं पराजय करावा, इंद्राची शक्ति मजपुढें कुंठित व्हावी, त्या इंद्राचा मज-

कडून पराजय व्हावा. ही त्या कलिकालाची प्रार्थना ऐकून तो कृपानिधि सांब कौतुक करिता झाला. तें असें कीं, त्या राक्षसास सहस्त्रभुजा शस्त्रांसहित अर्पण केल्या, त्यास शंभर मस्तकें दिलीं, त्या शंभर मस्तकांवर शंभर सुशोभित मुगुट दिले; त्याचप्रमाणें त्या मुगुटांवर छत्रें दिलीं. जें जें त्या कलिकालानें मागितलें तें तें शंकरानें त्यास तत्काल दिलें. एक योजन विस्तीर्ण असा देह त्या कलिकालास प्राप्त झाला. महाभयंकर भुजा, नानाविध भूषणें, चतुरंग बळ असें शंकरकृपेनें त्यास प्राप्त झालें. शंभर इंद्रांस न जुमानील असा तो बलिष्ठ झाला. महासदोन्मत्त हत्ती जसा आपलें देहभान विसरतो, त्याप्रमाणें तो कलिकाल मदोन्मत्त झाला. त्याचें तें सर्व सैन्यही मोठमोठ्या शस्त्रांनिशीं सिद्ध झालें. तो कलिकाल असें ह्मणाला कीं, मजवांचून आतां दुसरा कोणीच मोठा नाहीं. त्यानें एक विशाल दर्पण आपल्यापुढें ठेवून आपलें तें अक्राळविक्राळ रूप पाहिलें, त्या वेळीं तो गर्जना करून मोठ्या स्वरानें ह्मणाला, अरे, केवढें हें माझें थोर रूप! किती माझें शरीर उंच! ही रावणाची लंका मला किती जवळ दिसते! हा सोन्याच्या शिखरांचा मेरुपर्वत! ही वाराणशी मोक्षपुरी! हें बदरीवन! हें मानससरोवर, पहा एका लहानशा बिंदूसारखें दिसतें! ही भागीरथी समुद्रास मिळाली आहे! असे चमत्कार तो आपल्या उंच शरीरप्राप्तीच्या योगानें पाहून लोकांस

सांगूं लागला. अशा प्रकारचें अद्भुत रूप पाहून तो राक्षस मोठा आनंदित झाला; व शंभर मुखांनीं हास्य करून त्यानें मोठा सिंहनाद केला. तो नाद होतांच समुद्र खवळले. पृथ्वी, पर्वत डोलूं लागले. त्याचें तें भयंकर रूप इंद्रानें पाहून जशी वाऱ्यानें केळ थरथरां कांपते तसा इंद्र कांपूं लागला. सर्व ऋषि मूर्च्छित झाले. कोणी कंपायमान झाले. कांहीं तपोधन विप्र त्या तुंगपर्वतावर जाऊन बसले. तो कलिकाल आतां सर्व जग भक्षितो कीं काय, असें सर्व जनांस वाटूं लागलें. त्या राक्षसाच्या सैन्याच्या नादानें पृथ्वी व आकाश दणाणून गेलीं. सर्व दशदिशांस सैन्यच सैन्य होऊन गेलें. सैन्यरूपानें ही पृथ्वी चालते कीं काय असें वाटलें. त्या कलिकालाच्या आज्ञेप्रमाणें सैन्याचा व्यूह करून युद्धास तयार झाल्यावर तें सैन्य मोठें प्रचंड दिसूं लागलें. इंद्रानें ह्याप्रमाणें दैत्याच्या सैन्याची स्थिति पाहून आपल्या वीरांस पाचारिलें. तेव्हां इंद्र ह्मणाला, हें अजिंक्य सैन्य व हा भयंकर राक्षस आपणांस सहज पराजित करील; ह्यास्तव आपण श्रीदेवीचें स्तवन करावें. त्या वेळीं इंद्रादिदेवांनीं देवीचें स्तवन केलें तें:—हे जगद्धात्रि, सृष्टिस्थित्यंतकारिणि, आदिमाये, विशालनेत्रे, आमच्या ह्या संकटाचा क्षय कर. अशी प्रार्थना करून आपल्या चतुरंग दळाचा व्यूह केला. ऐरावतावर बसून इंद्र युद्धास तयार झाला. ह्याप्रमाणें हें कलिकालवर्णन व्यासांनीं सांगितल्यावर पुनः भारद्वाजऋ-

षींनीं व्यासांस प्रश्न केला कीं, दोन्ही दळें सिद्ध होऊन पुढें युद्ध कशा प्रकारचें झालें तें सांगा. व्यास ह्मणाले, देव तें राक्षसांचें भयंकर सैन्य पाहून मोठ्या धैर्यानें युद्धास सिद्ध झाले.

कलिकालानें पूर्वीं देवांनीं केलेला पराक्रम मनांत आठवून विचार केला कीं, ह्या देवांच्या ठायीं इतका प्रताप असण्याचें कारण मला हे ब्राह्मणांचे पुण्यमार्ग दिसतात. तर हें युद्ध समाप्त होईपर्यंत हे ब्राह्मण आणून कोंडावे ह्मणजे बरें होईल. हें कलिकालाचें वाक्य त्याच्या प्रधानानें ऐकून तो ह्मणाला, महाराज, अशा क्षुल्लक कारणानें शत्रूस जिकणें चांगलें नाहीं. शूरांचा पुरुषार्थ हाच कीं, युद्ध करून शत्रु जिकावे. हें भाषण ऐकून कलिकालानें मंत्र्याची स्तुति केली. नंतर तो मंत्र्यास ह्मणाला, आजच्या युद्धांत देवांची पूर्ण विटंबना करीन. दिक्पालांस धुळीस मिळवीन. ह्या देवांची काय स्थिति होईल ती मला सांगतां येत नाहीं. असें भाषण करून दोन्ही सैन्यें युद्ध करूं लागलीं. असंख्य रथ, पायदळ, घोडेस्वार सिद्ध झाले. भाले, बरच्या, मुसळें, मुद्गल, गदा, गोफणी, चक्रें, बाण, अशीं अनेकविध शस्त्रें वीरांनीं हातांत घेऊन ते तयार झाले. ह्या वीरांच्या चरणधूलीनें सूर्य दिसेनासा झाला. रथावरून युद्ध करणारे वीर रथ्यांबरोबर युद्ध करूं लागले. हजारों बाणांची वृष्टि होऊं लागली. दोहींकडचे मोठमोठे वीर रणांत पडूं ला-

गले. राक्षससैन्य देवांनीं पुष्कळच घायाळ केलें. हें पाहून त्या कलिकालानें आपला रथ पुढें आणिला. नंतर त्यानें असें भयंकर युद्ध केलें कीं, तें सांगतांच येत नाहीं. तो हजार भुजांचा महावीर फार चवताळला. मुद्गलांच्या योगानें पर्वतांचें चूर्ण केलें. ताडवृक्षांनीं व गदेच्या घायानें त्यानें देवसैन्य जर्जर केलें. देवांनीं त्या राक्षसांवर मोठमोठे पाश टाकावे, पण त्यांनीं ते सहज कमलनालासारखे तोडून फेंकून द्यावे. इतक्यांत हातांत तोमर घेऊन मेषावर आरूढ होऊन अग्नि त्या दैत्याशीं लढूं लागला. वायु आपलें भयंकर झंझास्वरूप धारण करून राक्षसाशीं युद्ध करूं लागला. त्यानें आपल्या अतुल शक्तीनें जशी कुऱ्हाड झाडें तोडिते, त्याप्रमाणें पुष्कळ राक्षससैन्य पाडिलें. त्या वायूवर दैत्य फारच प्रहार करूं लागले व त्यास आकर्षूं लागले. इतक्यांत तो कुंभकरूप वायु त्यांच्या गुदद्वारांतून बाहेर निघून गेला. अशा भयंकर समयास इंद्रानें त्या कलिकालावर नागास्त्र मंत्रून टाकिलें. तेणेंकरून कोट्यावधि नाग त्या दैत्याचे सेनेस वेढून टाकूं लागले. त्या कलिकालास तर त्या नागांनीं असें त्रासविलें कीं सांगतां पुरवत नाहीं. कोणी त्याच्या कानांत, कोणी नाकांत, कोणी कोठें, कोणी कोठें असे शिरूं लागले. इंद्रानें आणखी बाण सोडून त्या नागांची वृद्धि केली. त्या कलिकालाचीं छत्रें छेदून खालीं पाडिलीं. हें पाहून तो राक्षस इंद्रावर फार क्रो-

धायमान झाला. नंतर इंद्रही त्यावर अनेक अस्त्रें सोडूं लागला. तेव्हां त्या कलिकालानें शक्राचीं नानाप्रकारचीं शस्त्रें व अस्त्रें गिळून टाकिलीं. अशा प्रकारें त्या कलिकालराक्षसाशीं एकवीस दिवस इंद्रानें युद्ध केलें. इंद्राचीं कोट्यावधि शस्त्रेंअस्त्रें गिळून फक्त एक वज्र मात्र त्याजपाशीं शिल्लक राहिलें. सर्व देव, ऋषि त्रासून गेले. इंद्र अत्यंत संतापला, व आपलें तें वज्र इंद्रानें अति जोरानें त्या कलिकालाच्या मस्तकावर आपटिलें. तें वज्र अशा जोरानें मारिल्यावर भग्न झालें. भग्न होण्याबरोबर महान् तेजस्वी, महद्रूप अशी वज्रेश्वरी नामक देवी त्या भग्न झालेल्या वज्रांतून एकदम प्रगट झाली. ती महादेवी वज्रेश्वरी प्रगट होऊन भाषण करूं लागली कीं, 'मी द्विभुजांची देवी सर्व देवांस व ऋषींस वरदायिनी आहें. भक्तांच्या अभयार्थ व दैत्यांच्या प्राणनाशार्थ मी अवतीर्ण झालें.' त्या वेळीं सर्व देवऋषी त्या देवीच्या रूपास पाहून हर्षित झाले. देवांनीं वस्त्रें, समुद्रानें रत्नें, हिमवानानें भूषणें, बसण्यास सिंह, भूषणार्थ काजळ वगैरे, चंद्रानें चंद्रलांछन, सहस्राक्षानें आयुधें, कुबेरानें पानपात्र, अशा प्रकारचे सर्व पदार्थ देऊन, गंध, पुष्पें, धूप, दीप, नैवेद्यादि अर्पून पूजा केली. ह्याप्रमाणें दुःखदारिद्र्यनाशन करणाऱ्या जगदंबेचा देवांनीं पूर्ण सन्मान केला. जी वज्रेश्वरी महामाया, भक्तांचें संकट हरण करण्याकरितां, दैत्यांचा दर्पनाश करण्यास्तव, देवांचें व ऋषींचें भय दूर

करावें ह्मणून ह्या लोकीं अवतीर्ण झाली, ती अवलोकन करून सर्व देवगणांनीं पुनःपुनः तिला नमस्कार केला. ह्याप्रमाणें वज्रेश्वरी देवी उत्पन्न झाली. हा सारांश ह्या भागांत आला आहे.

---

## भाग तेरावा.

## श्रीवज्रेश्वरीच्या हस्तें दुर्धर, सिंहवक्र आणि लोहिताक्ष राक्षसांचा वध.

इंद्राच्या वज्रापासून श्रीवज्रेश्वरी देवी उत्पन्न झाल्याबरोबर सर्व देवांस अत्यानंद झाला, व ते देव श्रीदेवीची स्तुति करूं लागले. ती स्तुति अशीः—'हे महामाये वज्रेश्वरी देवी, तुला नमस्कार असो. तूं भक्तांची वरदायिनी व सर्व जनांची जननी आहेस. तूं सर्व देवऋषि, शुद्ध मनाचे नर ह्यांची गति, तूं दीनजनांचें भयनाशन करणारी, अशी आहेस. सांप्रत ह्या कलिकालराक्षसानें आह्मांस फार क्लेश दिले आहेत; ह्या क्लेशांचें निवारण करून ह्या दुःखांतून आमचें रक्षण कर. तूं स्वतः निर्गुण असून आह्मांस्तव सगुण रूप धरिलें आहे. हें सर्व चराचर तुझ्या स्वाधीन असून तूं संतुष्ट झाल्यावर हें सर्व जग संतुष्ट होतें. हें तुझें अद्भुत रूप कोण वर्णन करील ! अशा प्रकारची परात्परदेवता तूं असून सर्व मुनीश्वर तुझें ध्यान करितात. सर्व लोकांस वरप्रदान द्यावें, ह्याप्रमाणें तुझें मानस उदार आहे. आह्मी सर्व